# माझी अमेरिकावारी

2

नंदिनी देशमुख



# माझी अमेरिका वारी – भाग २

नंदिनी नीळकंठ देशमुख

nandini.deshmukh@gmail.com

mob. 9004094617

ई साहित्य प्रतिष्ठान

# माझी अमेरिकावारी-२

(Majhi Amerikawari)

लेखिका:- नंदिनी देशमुख

nandini.deshmukh@gmail.com

9004094617

प्रकाशक: ई-साहित्य प्रतिष्ठान

वेब: www.esahity.com

ईमेल esahity@gmail.com

प्रकाशन : 7 August 2016

©esahity Pratishthan®2016

❖ या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

# मनोगत



भारतामधून जे कुणी वयस्कर लोक अमेरिकेत जातात त्यातील नव्वद टक्के लोक आपल्या मुलीच्या किंवा सुनेच्या बाळंतपणासाठी जातात. अमेरिकेतील लोकांना याचे आश्चर्य वाटते. त्यांच्या दृष्टीने लग्न, बाळंतपण या गोष्टींसाठी आईवडिलांनी यायची काय गरज? हाच तर आपल्या आणि त्यांच्या संस्कृतीमधला फरक आहे ना? सुख दु:खामध्ये आपल्या जवळच्या लोकांना सामील करून घेणे ही आपली संस्कृती.

माझी सगळयात लहान मुलगी रश्मी, हिच्या बाळंतपणाच्या निमित्ताने मलाही असाच अमेरिकेला जाण्याचा योग आला. केवढे अप्रूप या गोष्टीचे. माझ्या प्रवासाच्या आठवणी मी लिहून ठेवल्या. ही गोष्ट डिसेंबर २००८ मधील. त्यालाही आता सात आठ वर्ष झाली. मी आल्यानंतर बरेच लोक कुतूहलाने मला अनेक प्रश्न विचारीत. तेथील माहिती विचारीत. तसेच कुणाला जायचे असेल तर मला त्यांचे फोन येत किंवा कुणी प्रत्यक्ष भेटून त्यांच्या मनातील शंका कुशंका विचारीत. (जशा मी पण काही लोकांना जायच्या आधी विचारल्या होत्या. ) त्यामुळे आपल्या अनुभवामध्ये इतरानाही सहभागी करून घ्यावे असे वाटले. तेव्हाच्या पेक्षा आता अमेरिकेला जाण्याचे प्रमाण वाढले आहे. पर्यटन करण्यासाठी सुध्दा आता लोक सहज युरोप, अमेरिकेची ट्रीप करतात.

त्यावेळी तसे नव्हते. शिवाय या सात आठ वर्षामध्ये आपल्याकडेही मॉल संस्कृती, इन्टरनेट, टी. व्ही., मोबाईल मुळे रोजच्या व्यवहारामध्ये खूप फरक पडला आहे. त्यात नाविन्य असे काही राहिले नाही. त्यामुळे मी लिहिलेल्या आठवणीतील बऱ्याचशा गोष्टी मला त्या वेळी जरी नवीन वाटल्या तरी आता काही त्या तशा वाटणार नाहीत. शिवाय मी नांदेडसारख्या एका छोट्या जिल्ह्याच्या ठिकाणाहून एकदम अमेरिकेला गेले, त्यामुळेही कदाचित हा फरक मला जास्त जाणवला असावा.

ह्या 'अमेरिका वारी' प्रवास वर्णनाचे मी एकंदर तीन भाग केले. पहिला भाग म्हणजे जाण्याचे ठरले तेव्हापासून विमानात बसेपर्यंत. सुरवातीला तयारी करतानाचे अनुभव, पासपोर्ट, व्हिसा, चार-पाच महिन्यासाठी जायचे म्हणजे इथली सगळी तयारी, शारीरिक, मानसिक आणि आर्थिक, हा सगळा अनुभव पहिल्या भागात आला आहे. दुसऱ्या भागात तेथील रोजचे घरातील दैनंदिन जीवन. तिकडील बाळंतपणाचे आपल्याकडील लोकांना खूप कुतूहल असते. तसेच रोजचे जीवन कसे असते याचीही उत्सुकता असते. ते सगळे सविस्तर वर्णन दुसऱ्या भागात केले आहे. आणि तिसऱ्या भागात आम्ही तिथे जवळपास कुठे कुठे फिरलो, काय काय बघितले त्याच्या आठवणी.

आठवणी लिहिताना त्या सरळ सरळ लिहिल्या होत्या. प्रसिध्द करतांना त्या बऱ्याच व्यवस्थित संकलित कराव्या लागल्या. मुख्य म्हणजे आधी रश्मीला सगळे वाचायला दिले आणि तिची संमती मिळाल्यावर नीलम आणि नमिता या दोघींना पण वाचून त्यांचे मत विचारले. सगळयांच्या विचाराने शेवटची प्रत तयार केली. आगामी पुस्तकांच्या यादीत सुनील सामंत यांनी बऱ्याच दिवसांपूर्वी या पुस्तकाची घोषणा केली, पण या सगळया गोष्टींमुळे

थोडा उशीर झाला. त्याबद्दल मी ई-साहित्यची दिलगीर आहे. पण आपल्या अनुभवामध्ये इतरांना सामील करून घेणे हा आनंद एक वेगळेच समाधान देवून जातो.

माझ्या तीनही मुली आणि जावई, नीलम-गिरीष, नमिता-निखील, आणि मुख्य रश्मी-सारंग ज्यांच्यामुळे मला अमेरिकेला जाण्याचा योग आला, हे सर्व माझ्या आयुष्याचे अविभाज्य घटक आहेत, त्यामुळे त्यांचे आभार मानणे म्हणजे मी माझे स्वतःचे आभार मानण्यासारखे आहे. तरीपण अशा मुली आणि असे जावई मला मिळाले हे मी माझे नशीब आणि त्याबद्दल परमेश्वराचे आभार मात्र नक्कीच मानते. या प्रवासाला जाण्यासाठी माझे नातेवाईक, मित्र-मैत्रिणी, कार्यालयीन सहकारी यांचे सहकार्य मला मिळाले, त्यांचीही मी आभारी आहे.

सुनील सामंत यांनीही त्यांच्या व्यापातून वेळ काढून बराच पत्रव्यवहार केला, आणि ई-साहित्यने हे माझे पुस्तक प्रकाशित केले त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

धन्यवाद.

नंदिनी देशमुख

अर्पण पत्रिका

माझ्या मुली, जावई आणि नाती

नीलम-गिरीष

नमिता-निखील

रश्मी-सारंग

आणि

अमेया, राधिका, विभा, मिहिका आणि श्रुती

यांना, त्यांनी माझ्या जीवनात भरभरुन दिलेल्या आनंदाप्रित्त्यर्थ.....

[माझी अमेरिकावारी भाग १](http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/majhi_amerikawari_nandini_deshmukh.pdf)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/majhi_amerikawari_nandini_deshmukh.pdf

# माझी अमेरिकावारी भाग २

दुसरे दिवशी सकाळी सहा वाजता विमान अटलांटाला पोंचले. तेथील विमान तळावर पाय



ठेवताच तेथील भव्यतेने माझे डोळे दिपून गेले. सतरा तासांचा प्रवास झाला तरी तारीख सहा डिसेंबरच होती. इथून पुढे हा तारखेचा आणि वेळेचा गोंधळ सुरु होणार होता. आता

मात्र माझी खरी परीक्षा होती. अटलांटाला उतरल्यानंतर पुढील एक एक सोपस्कार पार पाडायचे होते. मायग्रेशन फॉर्म भरणे, कस्टमचे चेकिंग या गोष्टी चालू होत्या. बाहेरून आलेल्या प्रवाशांची कसून तपासणी होत होती. त्यातल्या त्यात मुंबईला नुकताच २६ नोव्हेंबरचा दहशतवादी हल्ला झाल्यामुळे मुंबईहून आलेल्या प्रवाशांची तपासणी तर जास्तच कडक होत होती. माझी वेळ आली. पासपोर्टची तपासणी झाली. मी तिथे किती तारखेपर्यंत राहू शकते याची नोंद केल्या गेली. नंतर कस्टमला सामोरे जावे लागले. स्त्री अधिकारी होत्या. मी त्या दरवाज्यातून आत जातांना प्रत्येक वेळी बीप असा आवाज येत होता. सोन्याचे दागिने काढून ठेवले होते, पर्स जवळ नव्हती. तरी तसाच आवाज येत होता. त्या स्त्री अधिकारी बाईंनी मला दोन तीन वेळेस आत बाहेर करण्यास सांगितले. तरी पण तोच प्रकार. त्यांना काहीतरी शंका आली. त्यांनी मला एका बाजूला केले आणि दुसऱ्या एका स्त्री अधिका-याला बोलावले. मला जवळ जवळ पंधरा वीस मिनिटे तसेच उभे करून ठेवले. त्या अधिकारी बाईंनी मला एका बाजूला नेले आणि माझ्या सर्व अंगावर इलेक्ट्राॅनिक उपकरणे फिरवण्यास सुरवात केली. तसा तो आवाज जास्तच येत होता. तिला काहीतरी वेगळीच शंका आली असावी असे तिच्या चेहऱ्यावरून वाटत होते. मी तर खूपच घाबरून गेले होते. क्षणभर मनात विचार आला, आता ही काय आणखी नवीन भानगड? तिने पुन्हा एकदा ते उपकरण फिरवले. आणि आम्ही दोघींनी एकदमच एकमेकींकडे बघितले. मी जरीची साडी नेसली होती. ब्लाउजही तसेच जरीच्या काठाचे होते. जिथे जर होता, तिथे त्या उपकरणाचा स्पर्श झाला की तसा आवाज येत होता. तिने पुन्हा एक दोन वेळेस मुद्दाम त्या साडीच्या काठावरून आणि ब्लाउजच्या काठावरून ते उपकरण फिरवले आणि खात्री करून घेतली. माझ्याही लक्षात ती गोष्ट लगेच आली आणि आम्ही दोघीही हसायला लागलो. भाषा येत नव्हती तरी भावना कळत होत्या. एकदम अनोळखी ठिकाणी, अनोळखी व्यक्तींसमोर, तेही कस्टममध्ये अडकले असतांना असे आम्हाला एकमेकींकडे हसताना बघून बाजूचे लोकही आश्चर्याने बघत होते. मी पण रिलॅक्स झाले होते. तिने मला पुढे जाण्यास सांगितले. (आपल्या देशातली खरी जरीची साडी नेसल्याचे हे प्रताप. तरी तशी काही फार भरजरी, शालू किंवा पैठणी वगैरे नव्हती. थोडीशी बॉर्डर होती फक्त.)

माझ्या बरोबरचे सगळे लोक पुढे निघून गेले होते. आता परत एकदा सगळे सामान काढून चेक इन मध्ये द्यायचे होते. कारण आता डोमेस्टिक एयर पोर्टवर जायचे होते. मी सामानाजवळ गेले. तिथे एका मोठ्या पट्ट्यावर सगळयांच्या सूटकेस होत्या आणि तो पट्टा गोल चक्राकार फिरत होता. आपली बॅग आली की ओळखून काढून घ्यायची. हे असले काही सिनेमात पाहणे वेगळे आणि प्रत्यक्षात त्याला तोंड देणे वेगळे. आणि हे सर्व पहिल्यांदा घडत असल्यामुळे आणखीच टेन्शन. ईथेही मी सगळयात शेवटी राहिले. थोडी भांबावूनही गेले होते, पण तिथे एक साउथ इंडियन मुलगी होती. तिने मला मदत केली. माझे पूर्ण सामान घेवून चेक इन करेपर्यंत ती माझ्या सोबत होती. सामान तर एकदाचे गेले. आता मला इंटरनॅशनल एयर पोर्टवरून डोमेस्टिक एयर पोर्टवर ए-२५ या गेट नंबरवर जायचे होते. सगळीकडे सूचना लिहिलेल्या होत्या, खरे तर कुणाला काही विचारायची गरज नव्हती. तरी पण मी कुणाला तरी विचारून खात्री करून घेत होते. माझा सगळयात आणखी एक मोठा प्रॉब्लेम होता, तो म्हणजे मला त्या सरकत्या जिन्यांची खूप भीती वाटत होती. सारखे असे वाटत होते की आपण चढताना आणि बाहेर येताना आपला पाय बरोबर त्या

पायरीवर नाही पडला तर? आपली साडी तर त्या पट्ट्यात अडकणार नाही ना? एका ठिकाणी लिफ्ट होती तिथे मी लिफ्टनेच खाली गेले. ट्रेनसाठी खाली तळघरात जाणारा तो मार्ग होता. मला सतत असे वाटायचे की ट्रेनसाठी गर्दी असेल, आपल्याला ट्रेन पकडता येईल का? का पळावे लागेल? मला आपले भारतातील रेल्वे स्टेशन आणि त्यावरची गर्दी डोळ्यांसमोर दिसत होती. ट्रेन निघणाऱ्या प्लॅटफॉर्मवर मी पोंचले तरी तो रेल्वेचा प्लॅटफॉर्म आहे हे मला समजले नाही. तिथे काही लोक उभे होते. त्यात बरेचसे भारतीय आणि मराठी बोलणारेही काही लोक होते. त्यात एक पुण्याची मुलगी होती. ती आजूबाजूच्या लोकांना मराठीत समजावून सांगत होती. माझ्यासारखे बरेच जण तिथे होते. मी पण त्यांच्या त्या ग्रुपमध्ये सामील झाले. तिने मला सगळे व्यवस्थित समजावून सांगितले. तिथूनच ट्रेन मध्ये बसायचे होते. प्रत्येकाला कोणत्या ना कोणत्या तरी गेट वर जायचे होते. तिने आम्हाला सगळयांना सांभाळून घेतले. ट्रेन आली की दरवाजा आपोआप उघडला गेला. आम्ही आत चढलो. आत प्रत्येक गेटचे नाव डिसप्ले होत होते. प्रत्येक गेट येण्याआधी कोणता गेट नंबर येणार त्याची अनाऊंसमेंट होत होती. कोणते स्टेशन, म्हणजे ए, बी. सी. डी. येणार ते पण



सांगितले जायचे. मला थोडे हायसे झाले. त्या मुलीचा गेट नंबर आल्यावर ती उतरली. उतरतांना तिने पुन्हा एकदा मला समजावून सांगितले की तुमचा गेट नंबर आला की तुम्ही उतरा. त्याप्रमाणे मी उतरले.

आता पुन्हा त्या सरकत्या जिन्यावरून वर जायचे. मी लिफ्ट बघू लागले, पण मला लिफ्ट सापडेना. आणि लिफ्टने जास्त कुणी लोक जात नव्हते. मी थोडा वेळ तशीच तिथेच उभी राहिले. तो वर सरकणारा जिना एस्केलेटर (इलेव्हेटर आणि एस्केलेटर हे दोन्ही शब्द मला नंतर सारंगने सांगून माझ्याकडून घोटून घेतले होते.) रिकामा होता. आणि मला एकटीला त्यावरून जायची भीती वाटत होती. काय करावे? जास्त वेळ दवडण्यात अर्थ नव्हता. मला पुढचे विमान पकडायचे होते. तेवढ्यात पंधरा वीस जणांचा एक घोळका आला आणि त्या जिन्यावरून जाऊ लागला. मी पण पटकन हिम्मत केली. हातातील बॅग घट्ट धरली. साडीची निरी त्या पायऱ्यांमध्ये अडकेल असे वाटायचे म्हणून साडीच्या निऱ्या थोड्या वर करून एका हातात घट्ट धरून ठेवल्या. एका पायरीवर पाय ठेवला. देवाचे नाव घेवून मी त्या दिव्यातून पार पडले आणि माझ्या इच्छित स्थळी, ए नंबरच्या प्लॅटफॉर्मवर, जावून पोंचले. आता गेट नंबर पंचवीस शोधायचा होता. मी तो शोधून काढला. तिथे बसण्यासाठी आरामशीर जागा होती. आता मी बरीच सावरले होते. थोडे फ्रेश व्हावे असा विचार केला. पण तिथे कुठेच मी जाणार असलेल्या डीएल -७०१ बद्दल काहीच सूचना दिसत नव्हत्या. पुन्हा मनात विचार आला की आपले विमान इथूनच निघणार आहे का याची एकदा खात्री करून घ्यावी. तिथे काउंटर वर एक मुलगी बसली होती. मी माझ्या इंग्लिश मधून तिला विचारले, की गेट नंबर पंचवीस हाच आहे का? ती हो म्हणाली. मी पुन्हा विचारले, सॅनफ्रान्सिस्कोला जाणारी डीएल-७०१ ही फ्लाईट इथूनच जाणार आहे का? मी माझ्या हातातील बोर्डिंग पास तिला दाखवला. तो बघून तिने नकारार्थी मान हलवली आणि काहीतरी सांगितले. पण ती काय बोलते आहे ते मला काहीच कळत नव्हते. मला काहीच समजले नाही हे तिला समजले. ती स्वतः मला एकोणीस नंबरच्या गेटवर घेवून गेली. आणि तिथे येत असलेल्या सूचना मला दाखवल्या. माझ्या विमानाचा गेट नंबर बदलून आता ते पंचवीस ऐवजी एकोणीस नंबरवरून निघणार होते. माझा जीव भांड्यात पडला. (परदेशात जातानाही जीव भांड्यातच पडतो, इतर कुठे नाही याची मला जाणीव

झाली आणि थोडेसे भरून आले.) त्या सूचना बघितल्यावर ती काय सांगत होती ते मला समजले. जातांना तिने मला एक गोड स्माईल दिले आणि ‘thanks’ म्हणाली. खरे तर मीच आधी तिचे आभार मानायला पाहिजे होते. पण मी ते नंतर मानले.

आता मात्र मी एकदम निवांत झाले होते. सकाळी सहा वाजल्यापासून हे सगळे सोपस्कार चालले होते. आता साडेआठ वाजले होते. पावणे दहाला माझे विमान निघणार होते. तसा माझ्याकडे एक तासभर वेळ होता. येताना विमानात भरपूर खाणे झाले त्यामुळे भूक नव्हती पण तहान मात्र लागली होती. तिथे नळ दिसत होते पण पाणी पिण्यासाठी माझ्याजवळ काहीच नव्हते. काय करावे असा विचार करत असतांनाच एक माणूस आला आणि त्याने नळालाच खाली तोंड करून हाताने पाणी पिले. त्याने नळ कसा चालू केला ते मी हळूच बघितले. आणि मग मी पण तसेच करून हातानेच पाणी पिले. (हाताने असे पाणी पिणे मला माहित होते. लहानपणी शेतात विहिरीवर गेले की शेतातील गाडी माणसे पोहरयाने पाणी काढत आणि हातावर ओतत, ते असे हाताने प्यावे लागायचे. आता नाही का आपण बाटलीने पाणी पीत?) तिकडे टॉयलेट वर सगळीकडे रेस्टरूम असे लिहिलेले होते. (ही गोष्ट २००८ ची आहे, त्यावेळी मला तरी रेस्टरूम हा शब्द माहित नव्हता.) ते मला चित्र बघून कळले. मी फ्रेश झाले आणि एका ठिकाणी जावून बसले. कॉफी विमानात मिळत असल्यामुळे घेतली नाही. लौकरच डीएल-७०१ च्या लोकांना आत सोडण्यास सुरवात झाली. झोन वगैरे प्रकार मला मुंबईहून निघतांना समजला होता. शेवटी मी एकदाची सॅनफ्रान्सिस्कोला जाणाऱ्या विमानात बसले. आता काही काळजी नव्हती. तिथे गेल्यावर सारंग आणि रश्मी घ्यायला येणार होते. या विमानात मात्र मी एकटीच भारतीय आणि तेही साडीवाली होते. इथे मला खिडकी जवळची जागा मिळाली होती. सकाळची वेळ होती. बाहेर भरपूर उजेड होता. बाहेरचे दृश्य मोठे विलोभनीय होते. कितीही बघितले तरी माझ्या डोळयांची तृप्ती होत नव्हती. मी डोळे भरभरून बघत होते. जसजसे विमान वरवर जात होते, तसतसे ढग खाली जात होते. आणि मग एक वेळ अशी आली की सगळे ढग खाली आच्छादलेले दिसत होते आणि विमान त्याच्या वरून चालले होते. जमीन अजिबात दिसत नव्हती. असे वाटत होते की जणू आपण ढगातूनच जात आहोत. बाहेर बघून बघून माझी मान दुखत होती पण स्वर्गात असल्या सारखी मी हवेतून

तरंगत चालले आहे अशी सुखद जाणीव मन व्यापून राहिली होती.

थोडीशी भूक लागल्यासारखी वाटत होती. पण हा प्रवास कमी असल्यामुळे यात नाश्ता, जेवण असे काही मिळत नव्हते. जर आपल्याला काही हवे असेल तर ते पैसे देवून विकत घ्यावे लागणार होते. काहीतरी घेवून खावे असा मी विचार केला पण मी काय म्हणत होते ते त्या एयर होस्टेसला कळत नव्हते. तिने शेजारच्या माणसाला विचारले, की ही बाई काय म्हणतेय? पण तो म्हणाला की त्यालाही काही कळले नाही. शेवटी तिने एक छोटीशी पुस्तिका दिली होती त्यातील ड्राय फ्रूट्सचे चित्र मी तिला दाखवले.

'सिक्स डॉलर' माझ्याकडे थोड्या विचित्र नजरेने बघत ती म्हणाली.

मी पटकन पर्स मधून सहा डॉलर काढून तिला दिले आणि लगेच मनातल्या मनात हिशोब केला की, सहा डॉलर म्हणजे तीनशे रुपये. ड्रायफ्रूट्स घेतले खरे पण त्यातही मला जे आवडले तेच मी खाल्ले. नंतर कॉफी मागवली ती पण काळी. जावू दे आता कुठे दुध मागत बसा म्हणून मी ती काळी कॉफी तशीच पिवून टाकली. समोर टी.व्ही. होता पण त्यात पिक्चर वगैरे काही दिसत नव्हता. नकाशा दिसत होता. आपले विमान कुठे आहे, आपण जिथून निघालो ते शहर, जिथे जाणार ते शहर, सध्या दोन्ही ठिकाणी किती वाजले आहेत, आपण किती उंचीवर आहोत आणि आपल्याला तिथे जाण्यासाठी किती वेळ लागणार आहे ही सगळी माहिती त्यात दिसत होती. मी आधी ज्या विमानात बसले होते त्यातही हे असे सगळे दिसत होते, पण ते कसे बघायचे ते मला माहित नव्हते. इतर लोक बघत होते, ते मी बघितले होते. आत्ता या वेळी मात्र माझी ट्यूब पेटली. नंतर मात्र ते बघण्यात माझा बराच वेळ गेला. आत्तापर्यंत अमेरिकेच्या इतिहासात ऐकलेली गावांची नावे त्या नकाशावर प्रत्यक्षात अवतरली होती आणि त्यातल्याच एका गावाला मी जात होते.

विमान सॅनफ्रान्सिस्कोला पोंचले तेव्हा तिथल्या घड्याळात साडेबारा वाजले होते. मी अटलांटाहून निघाले तेव्हा तिथे सकाळी दहा वाजले होते. एकूण प्रवास साडेपाच

तासांचा झाला होता. दहा ते साडेबारा म्हणजे फक्त अडीच तास. इथले घड्याळ तीन तास मागे असते, त्याचा हा परिणाम. आणि तारीख सहा डिसेंबर. मी भारतातून सहा डिसेम्बरला सकाळीच निघाले होते आणि अजूनही सहा डिसेंबरचा दिवस संपला नव्हता. माझे तर डोके चक्रावून जात होते. वेळ मात्र भरपूर गेलेला होता. आता इथे काहीच प्रॉब्लेम नव्हता. सरळ बाहेर पडायचे होते. एक्झिट... एक्झिट असे बघत मी बाहेर आले. सारंग आणि रश्मीला कसे आणि कुठे शोधावे याचा मी विचार करत होते तो एकदम अनपेक्षितपणे रश्मी येवून माझ्या गळयातच पडली. लग्न झाल्यानंतर एकदम दोन वर्षांनी मी तिला बघत होते आणि तेही अशा अवस्थेत. डोळयांच्या कडांवर येत असलेले पाणी मोठ्या प्रयत्नांनी परतवले. आता आपण तिच्याच जवळ काही दिवस तरी राहणार आहोत याचे मनाला समाधान वाटत होते. त्यांना दोघांना बघून माझ्या मनावर आत्तापर्यंत असलेला सगळा ताण एका क्षणात नाहीसा झाला. माझ्या बॅग्ज शोधायला त्यांनी दोघांनी मदत केली. सारंगने गाडी आणली होती. सॅनफ्रान्सिस्को ते सँताक्लारा अशी गाडी पळायला लागली. एवढा वेळ मी हवेत तरंगत होते. आता जमिनीवर होते तरी पण तरंगतच होते. स्वच्छ, सरळ, सुंदर, भव्य डांबरी रस्ते. खेळण्यातल्या गाड्यांना चावी दिली की त्या जशा पळतात, तशा पळणाऱ्या गाड्या. कुठेही, कशाचाही आवाज नाही. कमालीची शांतता. छोटी छोटी टुमदार घरे. सगळीकडे दिसणारी फुलेच फुले, वेगवेगळया आकारांची आणि प्रकारची हिरवीगार झाडे असे आजूबाजूचे निसर्ग सौंदर्य बघून मन एकदम भारावून गेले होते. आणि त्यातल्या त्यात विशेष म्हणजे भर दुपार असूनही चटके न देणारे आल्हाद दायक उन. एवढ्या लांबचा प्रवास करून येवूनही माझे मन उल्हासित झाले होते. साधारण एक तासाचा तो प्रवास. पण संपूर्ण रस्त्यात मला एकही माणूस दिसला नाही. आम्ही घरी येवून पोंचलो होतो तर घड्याळात फ़क़्क्त दीडच वाजला होता. मी पुन्हा एकदा मनाशी हिशोब केला. माझ्या अंदाजाने मी अटलांटाहून सॅनफ्रान्सिस्कोला दुपारी तीन वाजता आणि घरी सँताक्लाराला संध्याकाळी चार ते साडेचारच्या दरम्यान पोंचायला पाहिजे होते. मी विचार केला होता की यांची जेवणे झाली असतील. पण त्यांचा सकाळी फक्त नाश्ताच झाला होता. रश्मीने स्वयंपाक करून ठेवला होता आणि ती दोघे मला घ्यायला आली होती. इथूनच मला एक एक आश्चर्याचे धक्के बसायला सुरवात झाली. घरात पाउल टाकले आणि पाय पडला तोच मऊ मऊ कारपेटवर. समोरच असलेल्या काचेवरील ब्लाइंडस सारंगने दूर केल्या.

गॅलरी असलेला मोठा व्हरांडा होता. समोर नुकतीच पाने गळालेले दोन मोठे मोठे वृक्ष, नुसत्या वाळलेल्या फांद्या असलेले. आणि डाव्या बाजूला असलेला निळेशार पाणी असलेला स्विमिंग पूल. रश्मी म्हणाली,

‘हे आमचे घर.’

‘व्वा, सुंदर. मस्तच आहे एकदम.’ मी पटकन म्हणाले. एक बेडरूम, हॉल, कीचन. हॉल एकदम मोठा, प्रशस्त. मोठा टी.व्ही., एका कोपऱ्यात डायनिंग टेबल, सोफा, माझ्यासाठी म्हणून खास तयार केलेला एक बेड. ते सगळेच मला खूप खूप आवडले. मी अगदी आधाशासारखे, कधी काही न बघितल्यासारखे ते सगळे बघत होते.

तेवढ्यात रश्मी म्हणाली,

‘आई, तुला आंघोळ करायची असेल ना? दोन दिवसांचा प्रवास झालाय.’

‘दोन दिवस?’ मी म्हणाले. पुन्हा डोक्यात गोंधळ. यांचे घड्याळ आपल्यापेक्षा बारा तास मागे. पूर्वी कधीतरी शाळेत असतांना शिकलो होतो की पृथ्वी सूर्याभोवती प्रदक्षिणा घालते, त्यावेळी तिचा जो भाग सूर्यासमोर असतो तिथे दिवस आणि जो सूर्याच्या विरुध्द बाजूला असतो तिथे अंधार, म्हणजे रात्र. रश्मी अमेरिकेला गेल्यानंतर जेव्हा केव्हा आम्ही फोनवर बोलत असू किंवा चाटिंग करत असू, तेव्हा पहिल्यांदा मी तिला विचारायचे की आता तुमच्याकडे किती वाजले आहेत? पण आता तर मी स्वतःच तिथे होते. माझ्या मनात विचार आला की आता भारतात भर मध्य रात्र असून सगळे गाढ झोपले असतील. या विचाराने माझे मलाच हसू आले.

रश्मी सारंगला म्हणत होती, ‘अरे, आपण एक बादली आणणार होतो ना आईला आंघोळीसाठी.’

'खरंच, राहिलंच की गं. आज आणू.' तो म्हणाला.

'आई, तुला शॉवरखाली जमेल का आंघोळ करायला?' रश्मी मला विचारत होती.

'शॉवरखाली?' मी उडालेच. आत्तापर्यंत शॉवर फक्त बघितले होते. पण कधी चुकून ते चालू झाले तर सगळ्या डोक्यावर, तोंडावर पाणी उडायचे आणि जीव घाबराघुबरा व्हायचा.

'अगं, सगळे पाणी डोक्यावर येईल ना?' मी माझ्या मनातली शंका बोलून दाखवली.

ती म्हणाली, 'तसे नाही होत गं आई. बरोबर उभे राहून पाणी अंगावर घ्यायचे. काही होत नाही. मी सांगते तुला कसे सुरु करायचे ते. आजच्या दिवस कर. संध्याकाळी आपण तुझ्यासाठी एक बादली आणि मग्गा घेवून येवू.'

मग बाथरूममध्ये जाण्याचा तो प्रकार. ते पांढरे स्वच्छ टब. त्यात उतरणे. रश्मीने मला सगळे समजावून सांगितले. डावीकडे फिरवले की गरम पाणी आणि उजवीकडे फिरवले की थंड पाणी. अमेरिकेत कुठेही जा, सगळीकडे असेच असते. आणि बारा महिने गरम पाणी मिळते. शेवटी कसाबसा तो अंघोळीचा सोपस्कार पार पडला. शॉवरखाली केलेली ती पहिली आंघोळ. रश्मीला मी लहानपणी जशी समजूत घालून, गोड गोड बोलून आंघोळ करायला लावत असे तोच प्रकार आता उलट घडला होता. तिने मला समजावून सांगून, गोड गोड बोलून शॉवरखाली आंघोळ करायला लावली.  खरे तर आजकाल ह्या सगळ्या सुखसोयी आपल्याकडे पण आहेत. पण एकतर त्या आमच्यापर्यंत आल्या नव्हत्या किंवा कुठे बघितल्या तरी हे जे काही आहे ते आपल्यासाठी नाही, इतर खास कुणासाठी तरी असेल असा मनावर बिंबलेला एक संस्कार.

रश्मीने स्वयंपाक करून ठेवलेलाच होता. आम्ही जेवण केले. नंतर ती मला म्हणाली,

‘आता भारतातली रात्र आहे आई, तुला झोप येईल. झोपायचे असेल तर झोप थोडावेळ. मग संध्याकाळी आपण बाहेर जावू.’

मलाही झोप येतच होती. विमानात बसून अंग आखडून गेले होते. पण थकवा मात्र अजिबात वाटत नव्हता. थोडावेळ झोपावे असा विचार करून मी आडवी झाले.

रश्मीच्या हाक मारण्यामुळे मी दचकून उठले. बघितले तो काय! बाहेर सगळीकडे दाट अंधार. लाईट चालू. रश्मी म्हणत होती, ‘आई, उठतेस कां? कॉफी करू का?’

‘किती वाजले?’ मी विचारले. किती वाजले असतील मला अंदाजच करता येईना. किती वेळ झोपलो आपण?

‘संध्याकाळचे साडेपाच वाजले आहेत. उठायचे का? का अजून झोपणार आहेस थोडावेळ?’ ती विचारत होती.

‘संध्याकाळचे साडेपाच, आणि एवढा अंधार?’

‘अगं, इथे दिवस लौकर मावळतो. साडेचारपासूनच अंधार पडायला सुरवात होते. तुला कॉफी करू का? आता आणखी झोपलीस तर तुला रात्री झोप येणार नाही. कारण त्या वेळेस भारतात दिवस असतो. काही दिवस तुला आता असेच होईल. तुझा जेटलॅग सुरु झाला आहे.’

तेवढ्यात सारंग रश्मीला म्हणाला, ‘आपण असे करू, आता कॉफी प्यायला बाहेरच जावू. म्हणजे मां फ्रेश होतील. मस्तपैकी स्टारबक्स मध्ये जावू.’ नंतर माझ्याकडे

बघून तो मला म्हणाला, 'चला मां, मी तुम्हाला इथली मस्त कॉफी पाजवतो. फ्रेश होवून जाल एकदम.' (माझे तीनही जावई मला 'मां म्हणतात.)

आम्ही तयार होवून बाहेर पडलो. पुन्हा तेच. भव्य रस्ते. शिस्तीत धावणाऱ्या गाड्या. शांत वातावरण आणि नो माणूस. जवळच स्टारबक्सचे एक कॉफीशॉप होते. तिथे आम्ही गेलो. मला वाटले, कॉफी शॉप तरी निदान गजबजलेले असेल. 'थ्री कॉफीज', 'टू कॉफीज' असे काहीतरी आवाज येतील. पण कसचे काय? एका टेबलवर दोन माणसे बसलेली होती. आणि आणखी दुसऱ्या टेबलवर एक मुलगा लॅपटॉप घेवून बसला होता. सारंगने जावून कॉफीचे मग्ज आणले. ते मग्ज पण भले मोठे होते. कॉफी मात्र छान होती. अगदी मला जशी पाहिजे होती तशी.

सारंग सांगू लागला, 'इथे लोक कितीही वेळ येवून बसू शकतात. तुम्ही तुमचे अभ्यासाचे सामान, लॅपटॉप, वाचायला एखादे पुस्तक काहीही घेवून या. किंवा नुसते आरामात गप्पा मारत बसा. तुम्हाला कुणी उठा म्हणणार नाही.'

'अरे व्वा. मस्त. किती छान, शांत वातावरण. इथे येवून एखादे पुस्तक घेवून वाचत बसावे आणि छानपैकी कॉफीचे गरम गरम घोट घ्यावेत.' माझ्या मनात असलेली कल्पना एकदम तोंडावाटे बाहेर पडली. माझ्या डोळयासमोर आपल्या इकडचे गजबजलेले हॉटेल्स दिसत होते.  आम्ही पण तिथे बराच वेळ गप्पा मारत बसलो. ती दोघेही मला तिकडचे बरेच काही सांगत होती.

त्यानंतर आम्ही एका दुकानात गेलो. आंघोळीसाठी बादली घ्यायची होती. दुकान बघूनही मी थक्क झाले. मोठी मोठी दालने, प्रत्येक ठिकाणी पाट्या लावलेल्या, खरेदी करणारे गिऱ्हाईकही मोजकेच. शांत वातावरण. हल्ली आपल्याकडेही असे मॉल झाले आहेत. पण वातावरणात फरक वाटला. तिथून एक बादली, मग्गा आणि कपड्याचा एक साबण घेतला. आपल्याकडे सहा रुपयांना मिळणारा साबण तिकडे दोन डॉलरला मिळाला.

म्हणजे शंभर रुपये? बाप रे..! शंभर रुपयात किती साबण येतील? माझे विचारचक्र सुरु झाले.

एवढे होईपर्यंत साडेआठ वाजले. त्यांनी दोघांनी असा विचार केला की आता घरी जावून कुठे स्वयंपाक करणार? त्यापेक्षा बाहेरच काहीतरी खाऊन घेवू म्हणजे घरी गेले की झोपायाचेच काम. सारंग मला म्हणाला,

‘कुठे जायचे मां? काय खाणार?’

तेवढ्यात रश्मीच म्हणाली, ‘अरे आज तर आईचा पहिला दिवस. तिला काय माहित असणार कुठे जायचे ते? आज तरी आपण इंडियन रेस्टॉरंट मधेच जावू या. मग पुन्हा बघू नंतर कुठे दुसरीकडे जायचे ते.’

त्याप्रमाणे आम्ही एका इंडियन रेस्टारंट मध्ये गेलो. मी आणि रश्मीने पावभाजी घेतली. सारंगने पूर्ण जेवणाची थाळी घेतली. आम्ही जेवणाची पण टेस्ट घेतली. सगळेच छान होते, मला आवडले.

घरी आल्यावर इथली रात्र म्हणून पुन्हा झोप आणि भारतातला दिवस म्हणून मधून मधून जाग. दुसरे दिवशी सकाळी उठून कॉफी, आंघोळ, पूजा, नाश्ता झाला की आपोआप डोळे मिटायला लागले. भारतातली रात्र. अकरा वाजता झोपले की एकदम दोन तीन वाजता उठणार. दुपारचे जेवण की पुन्हा झोप. नंतर एकदम संध्याकाळी साडेपाचलाच उठणार. कॉफी घेवून बसायचे. सारंग आला की थोडे बाहेर जायचे. जेवण कधी बाहेर तर कधी घरी. आणि रात्री पुन्हा झोप. दुपारची झोप सुध्दा अशी गाढ लागायची की बस. आधीच तर मला झोप प्रिय. आणि आता तर कारण मिळाले होते. सध्या तरी माझ्या दृष्टीने दिवस नव्हताच. भारतातली रात्र आणि अमेरिकेतली रात्र. बस. फक्त कामापुरते उठायचे. आणि पुन्हा झोप. एकदा तर मी काळजीत पडले, वाटले हे जर असेच चालू राहिले तर कसे व्हायचे आपले? आपण इथे बाळंतपण करायला आलेलो आहोत, झोपा काढायला नाही.

साधारण आठ दिवस माझा असा कार्यक्रम चालू होता. जेटलॅग असतो हे रश्मीला पण माहित होते पण आता ती सुध्दा कंटाळली होती. मला पण कसेतरीच वाटत होते. छे..! आता आपण इकडच्या वातावरणाशी  जुळवून घ्यायलाच पाहिजे. बस झाली आता ही नाटकं. आता दुपारी झोपायचेच नाही. मी मनाशी पक्के ठरवले. आणि मग प्रयत्नपूर्वक दुपारची झोप टाळू लागले. दुपारी रश्मी आणि मी कॅरम खेळायचो. टी.व्ही. बघायचो. तिथे ऑन लाईन झी मराठी चॅनल दिसत होते. माझ्या सगळ्या सिरियल्स बघायला मी सुरवात केली. सारेगम लिटल चॅम्प्स, असंभव आणि इतर कार्यक्रमाच्या तिथल्या वेळा मी बघून घेतल्या. त्याप्रमाणे माझा दैनंदिन कार्यक्रम ठरवला. रोज संध्याकाळी बाहेर जाणे चालू होते.

एकदा असेच संध्याकाळी आम्ही बाहेर पडलो. तो भाग खूपच पॉश होता. स्वच्छता तर कमालीची होती. मोठमोठी दुकाने होती. तिथे पुस्तकांचे एक दुकान होते. खास ते दुकान दाखवण्यासाठी सारंग मला तिथे घेवून आला होता. वेगळ्या वेगळ्या पुस्तकांची दालने. व्यवस्थित लावलेली पुस्तके. तिथे जावून पुस्तक विकतच घेतले पाहिजे असे नाही तर तिथे जावून आपल्याला जे पुस्तक वाचायचे असेल ते घेवून तिथेच वाचत बसण्याची सोय होती. कुठलेही पुस्तक काढा, तिथेच कितीही वेळ बसून ते वाचा, पुन्हा जागेवर ठेवून द्या. कुणीही काहीही म्हणणार नाही. तिथे तशी बसण्यासाठी, लॅपटॉप ठेवण्यासाठी जागा पण असायच्या.  शिवाय आपल्याला हवे ते पुस्तक शोधण्यासाठी जागजागी कॉम्पुटर ठेवलेले होते. त्यात अनुक्रमणिका असायची. पुस्तकाचे किंवा लेखकाचे नाव टाकले की त्याच्या कपाटाचा नंबर आणि पुस्तकाचा नंबर यायचा. दोन मजली बिल्डींग होती. तिथे तो सरकता जिना होता, ज्याची मला भीती वाटायची. सारंग मला म्हणाला,

‘मां, या जिन्यावरून दोन तीन वेळेस खाली वर करा. म्हणजे तुमची भीती जाईल. मग भारतात परत जातांना तुम्हाला काही वाटणार नाही.’

मला वाटले, तसे करतांना आपल्याला कुणी बघितले तर? त्यामुळे मला संकोच वाटत होता. शेवटी तो स्वतः माझ्याबरोबर आला. आम्ही तिघांनी पण त्या जिन्यावरून दोन तीन वेळेस खालीवर केले. रश्मीला नववा महिना लागला होता पण ती

अगदी सहजपणे त्यावर उभी होती. मला एक जुना प्रसंग आठवला. अमेयाच्या वेळी निलूला नववा महिना लागला होता त्यावेळी तिला बाळंतपणाला आणण्यासाठी मी मुंबईला गेले होते. नमा आणि रश्मी पण तिथेच शिकायला होत्या. आम्ही सगळे असेच बाहेर एका मॉल मध्ये गेलो होतो. तिथे असा सरकता जिना आम्ही पहिल्यांदा बघितला. सर्वांनाच भीती वाटत होती. पण मला थोडी जास्त. मी निलूला त्या जिन्यावरून जावू दिले नाही. मला काळजी वाटत होती. नववा महिना लागलेला, उगाच कुठे पाय वगैरे अडकला, घसरला तर? आणि मी सगळयांनाच लिफ्टने जायला यायला लावले. रश्मीला पण आत्ता नेमके तेच आठवले आणि आम्ही दोघी हसू लागलो.

माझा आणखी एक प्रॉब्लेम होता. तिथे थंडीचे दिवस असल्यामुळे मला सारखे बाथरुमला जावे लागायचे. घरून निघतांना जावून आले तरी बाहेर पडल्यानंतर एखादा तास झाला की त्रास सुरु व्हायचा. पण तिथे एक सोय मात्र खूप छान होती. जागजागी, तुम्ही कुठल्याही दुकानात, कॉफी शॉप मध्ये जा, तिथे रेस्टरूम असायच्या. आणि टॉयलेट सुध्दा दहा बारा. लोकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होवू नये याची काळजी घेतलेली असायची. पाणी भरपूर. काही ठिकाणी तर ऑटो फ्लश असायचे. घाणीचे नाव नाही. तिथल्या जवळ जवळ प्रत्येक दुकानातील आणि हॉटेल्स मधील रेस्टरूम मी बघितल्या.

पुस्तकांच्या दुकानातून बाहेर पडल्यानंतर आम्ही एका छानशा रेस्टाॅरंट मध्ये गेलो. थंडीचे दिवस असल्यामुळे बाहेर ज्या खुर्च्या टाकल्या होत्या तिथे असे शेकोटी सारखे लँम्प लावले होते. तिथली ऑर्डर घेणारी मुलगी खूपच गोड, बाहुलीसारखी आणि हसतमुख होती. टोमेटो सूप आणि पिझ्झा मागवला. सूप घेत असतांना माझ्या तोंडातून फुर्र फुर्र असा आवाज येत होता. रश्मीने मला हळूच सांगितले, की असा आवाज करू नको म्हणून. मला कसेतरीच झाले. माझ्या न कळत मी ते सूप पिणे एन्जॉय करत होते. आपण कुठे आहोत हे सुध्दा मी क्षणभर विसरले होते. पण इथे मॅनर्स आणि एटिकेट्सला जास्त महत्व द्यावे लागते हे माझ्या लक्षात आले. आजूबाजूच्या लोकांच्या लक्षात तर ही गोष्ट आली नसेल ना? मी हळूच इकडे तिकडे बघितले. शेजारच्या टेबलवरची माणसे उठून जात होती आणि जातांना एकमेकांचा निरोप घेत होती. निरोप घेतांना एका मुलीने त्यातील एका

मुलाला भर रस्त्यात कीस केले. आत्तापर्यंत फक्त ऐकले होते, आता प्रत्यक्ष डोळयांनी बघितले. अमेरिका होती ती..!

तिथल्या रोजच्या जीवनाशी जुळवून घेण्याचा मी प्रयत्न करीत होते. रश्मीने मला त्यांच्या अपार्टमेंटचा सगळा एरिया दाखवला. तेवढी रोज एक चक्कर मारली तरी अर्धा तास लागत असे. कारच्या पार्किंग लॉटचा भागच खूप मोठा होता. असे पाच पार्किंग विभाग होते. तेवढे जरी फिरले तरी खूप होत असे. मी रोज फिरायला जायला सुरवात केली. कधी पूर्ण अपार्टमेंटला फेरी मारायची तर कधी पार्किंग लॉट मधेच फिरायचे. मी सहसा दुपारी तीन चार वाजता बाहेर पडत असे. तरी थंडी वाजायची. स्वेटर घातल्याशिवाय कुठे बाहेर जाता यायचे नाही. रस्ता क्रॉस करायच्या तर मी कधी भानगडीत पडलेच नाही. सिग्नलच्या खांबाला एक बटन असते, ते आपण प्रेस करायचे. आणि चालण्याचे इंडीकेशन आल्यावर चालायला लागायचे. कधी त्या ठिकाणी माणसाचे चित्र यायचे, कधी नुसताच एक हात चालू, बंद व्हायचा तर कधी 'डोन्ट वॉक' च्या ऐवजी 'वॉक' असे यायचे. पंधरा पासून आकडे सुरु व्हायचे ते शून्य येईपर्यंत. तेवढ्या वेळात आरामात रस्ता क्रॉस करून होई. जिथे सिग्नल नसते तिथे पायी चालणाऱ्या लोकांना रस्ता क्रॉस करण्यासाठी प्राधान्य देण्यात येई. पायी चालणारा माणूस दिसला की गाड्या थांबतात. आपण इकडे आधी गाड्यांना जावू देतो आणि कितीतरी वेळ तसेच थांबतो. तिकडे तसे नाही, माणूस दिसला की गाडी थांबते. मी एकदोन वेळेस अशी थांबले तेव्हा गाडीतील लोकांनी मला हाताने खूण करून तुम्ही जा असे सांगितले, तेही हसतमुखाने.

घरातीलही बऱ्याच नवीन नवीन गोष्टी मी समजून घेवू लागले. इथले लाईटचे बटन उलटे असते. तसे बरेच काही उलटे असते. रस्त्याने जातांना आपण डाव्या बाजूने चालतो, गाड्या डाव्या बाजूने जातात, तिकडे उजव्या बाजूने जायचे. गाडीत ड्रायव्हिंग सीटही उलट्या म्हणजे उजव्या बाजूला. माणसे मात्र सरळ दोन पायांनी चालतात. लाईटचे बटन वर असले की लाईट चालू आणि खाली असले की बंद. पहिले दिवशीच लाईटची सगळी बटने खाली बघून मी रश्मीला म्हणाले की, 'अगं, तुमचे लाईट गेले की काय? लोड शेडींग आहे का?' तर सारंग आणि ती दोघेही हसू लागली. रश्मी म्हणाली, 'आई, इथे लाईट

जाणे वगैरे असा काही प्रकार नाही. इथे लोड शेडींग नसते. इथली बटनंच अशी असतात.' मग मला पण हसू आले. खरे तर मी त्याबद्दल ऐकले होते, पण माझ्या लक्षात नव्हते. घरातल्या कामांचेही तसेच. सकाळी उठल्याबरोबर आपल्यासारखी कामांची घाई नाही. दूधवाला, मोलकरीण, पाणी भरण्याचे, रस्त्यावर ओरडण्याचे आवाज, पेपरवाला काही नाही. दुधाचा कॅन एकदाच आणून ठेवायचा, आपण तेलाचा आणतो तसा. त्यावर एक्सपायरी डेट असते तोपर्यंत वापरायचा. भांडी घासण्यासाठी डीश वॉशर कसे लावायचे ते मला रश्मीने शिकवले. काम खूपच सोपे वाटले. मोलकरणीने सुट्टी घेतल्यावर पडलेला भांड्यांचा ढिगारा डोळ्यासमोर आला. कपड्यांचेही तसेच. रोजच्या कपड्यांचे सात आठ जोड ठेवायचे. रोज कपडे नाही धुतले तरी चालते. आठ – दहा दिवसाला एकदा लॉन्ड्री करून आणायचे. एका मोठ्या हॉलमध्ये वॉशिंग मशीन आणि ड्रायर्स असतात. त्यात आपले कार्ड इन्सर्ट करायचे. कपडे धुवून आणि वाळून तयार. घरी आणून घड्या करून ठेवल्या की झाले. कुठलेही काम करतांना नगदी पैसे नाही, कार्ड पेमेंट. सकाळी उठल्यावर झाडून काढणे आणि लादी पुसणे हा प्रकार नाही. कार्पेट असल्यामुळे दोन तीन दिवसाला मशीनने व्हॅक्युम करायचे. घरी असले की अखंड कामाच्या रगाड्यात बुडणाऱ्या आमच्या सारख्यांना हे सर्व कित्ती कित्ती सोप्पे. एखाद्या अवघड विषयाचा सोपा पेपर सोडवायला जावे तसे वाटत होते.

रोज संध्याकाळी आम्ही बाहेर जात असू आणि येतांना बाहेरच खावून येत असू. रश्मी एकदा बाळंतीण झाली की मग एवढे बाहेर जायला मिळणार नाही आणि असे चमचमीत वेगवेगळे पदार्थ पण खायला पण मिळणार नाहीत असे वाटत होते. इन्टरनेटवर एक साईट होती. डॉक्टरकडे चेकअप साठी नाव नोंदवले की त्या साईटवरून मेल येत. रश्मीला तशा प्रकारचे मेल दर आठवड्याला यायचे. त्यात 'your pregnancy this week' म्हणजे प्रत्येक आठवड्याला '20th week', '30th week', '31st', '32nd', नंतर 36, 37 आठवड्यापर्यंत असे असायचे. तिथे दिवस महिन्यात नाही, आठवड्यात मोजतात. आपण सातवा महिना लागला, आठवा महिना लागला, नववा महिना लागला असे म्हणतो तसे तिथे '20th week', '30th week' असे म्हणत असत. त्या मेलमध्ये बरीच माहिती

असायची. त्यात या आठवड्यात तुम्हाला असे होत असेल, तसे होत असेल, आता तुम्ही चांगले खाऊन घ्या, बाहेर फिरून घ्या, सिनेमा बघून घ्या, झोपून घ्या असे असायचे. ते वाचून मला मजा वाटायची. आपल्याकडे मोठ्या अनुभवी बायका पहिलटकरणीला असे सांगतात. मी पण तिला असे बरेच काही सांगायची. पण म्हणतात ना सोनाराने कान टोचावे. आपण काही सांगितले की मुलीना वाटते काहीतरीच सांगतात. पण त्याच गोष्टी इन्टरनेटवर लिहून आल्या की.... असो. मला असे वाटायचे घरी आपण तिला काहीतरी वेगळे, तिच्या आवडीचे पदार्थ करून खावू घालावे. त्याप्रमाणे मी सकाळी काही बनवायची. आणि रात्री ती दोघे मलाच बाहेर नेवून काहीतरी वेगवेगळे नवीन नवीन खावू घालीत होती. मी पण ठरवले होते की आपण सगळे टेस्ट करून बघायचे. तेवढाच नवीन अनुभव. 'कुंग फु' या थाई रेस्टोरंटमध्ये गेलो होतो. तिथली करी, मसालेभात आणि नारळाच्या दुधात शिजवलेला गोड भात मला आवडला. पनीरा नावाचे एक रेस्टोरंट होते, तिथे ब्रेडचे वेगवेगळे प्रकार मिळायचे. ब्रेडच्या बाऊलमध्ये टोमेटो सूप. कुठल्याही रेस्टोरंटमध्ये ऑर्डर देणे हा प्रकार नाही. काउंटरवर जावून पैसे भरून काय पाहिजे ते सांगायचे. ते एक टोकन देतात. आपला नंबर आला की अनाऊंसमेंट होते, मग आपण तिथे जावून ते घेवून यायचे. ते टोकन इलेक्ट्रोनिक पण असायचे. आपला नंबर आला की त्यात लाईट लागून आवाज यायचा. हे सगळे असे काही काही बघून मला गंमत वाटायची. चायनीज रेस्टोरंटमध्ये नूडल्सचे प्रकार तर मेक्सिकन रेस्टोरंटमध्ये मैद्याचे. तिथे आणखी एक प्रकार मला खूपच मजेशीर वाटला. तो म्हणजे 'ड्राईव्ह थ्रू'. गाडीतून खाली न उतरताच ऑर्डर द्यायची. आपण गेट मधून आत प्रवेश केला की तिथे एक फोन असतो. तिथे एक सेन्सर लावलेला असतो. कोणतीही गाडी आली की वेलकम होतं. खाली न उतरताच त्या फोनवरून आपण आपली ऑर्डर द्यायची. आणि थोडे पुढे गेले की तिथे एक खिडकी असते तिथून आपण ऑर्डर दिलेले खाण्याचे पदार्थ घ्यायचे. नंतर सरळ बाहेर पडायचे. तिथेही आपल्या मागे बऱ्याच गाड्या नंबर लावून उभ्या असतात.

मी गेले होते तेव्हा डिसेंबर महिना होता. त्यावेळी त्यांचा नाताळचा मोठा सण होता. तसेच एकतीस डिसेंबर आणि एक जानेवारी. जुन्या वर्षाचा शेवट आणि नवीन वर्षाची सुरवात हे दोन्ही दिवस ते लोक सणासारखे साजरे करतात. त्यांचे बघून हल्ली

आपल्याकडे पण हे वेड वाढत चालले आहे. पण आपल्या संस्कृतीत सणांची भरपूर रेलचेल आहे. प्रत्येक सणाचे त्या त्या वेळेप्रमाणे महत्व आहे. ते सोडून अंधपणाने पाश्चात्त्यांचे अनुकरण करण्याचे प्रकार वाढत आहेत. तिकडे असलेले आपले लोक आवर्जून, आठवण ठेवून आपले सण जसे जमेल तसे साजरे करतात.

डिसेंबरचा शेवटचा आठवडा म्हणजे अमेरिकन लोकांना आपल्या दिवाळी सारखाच. प्रत्येक घरासमोर लाइटिंग केलेली असायची. लाईटचे वेगवेगळया प्रकारचे सीन तयार केलेले असायचे. रात्री अंधारात ते खूपच शोभायमान दिसायचे. कुठे लाईटचे घर, कुठे लाईटचे प्राणी तर कुठे लाईटची झाडे आणि फुले. ख्रिसमस ट्री तर प्रत्येक घरासमोर असायचाच. आपल्याकडे दिवाळीच्या वेळेस आकाशकंदील असतो तसा. नाताळ संपल्यानंतर तो कचरा जमा करण्यासाठी खास व्यवस्था केलेली असायची. नाताळच्या निमित्ताने एका ठिकाणी खास लाईट शो होता. सारंगच्या कंपनीतर्फे पण त्यात काही सीन केलेले होते. त्यांच्या कंपनीतील लोकांना तिथे दोन दिवस फ्री प्रवेश होता. एरव्ही पंधरा डॉलर तिकीट होते. त्याच्या कंपनीने ठरवलेल्या एका दिवशी आम्ही गेलो पण खूपच मोठी लाईन होती. आणि बरोबर दहा म्हणजे दहा वाजता शो बंद व्हायचा. खूप मोठी लाईन असल्यामुळे आम्ही त्या दिवशी वापस आलो. आणि मग पुन्हा नंतर एक दोन दिवसांनी गेलो. खूप मोठा एरिया होता. संपूर्ण शो गाडीतूनच बघायचा होता. हळू हळू गाड्या एका

लाईनमध्ये पुढे पुढे जात होत्या. वेगवेगळया प्रकारचे सीन लायटिंगच्या सहाय्याने केले होते. प्राणी, पक्षी, झाडे, फुले, लहान मुले बास्केट बॉल खेळतांना, डायनोसॉर शिकार करतांना, कोळी जहाजावरून मासे पकडताना, हरीण पळताना अशी खूप सारी दृश्ये होती. लहान




मुलांप्रमाणेच मोठी माणसेही एन्जॉय करत होती. तो शो बघून खूप छान वाटले.

सारंग कॅरम खूप छान खेळायचा. आम्ही तिघेही आळीपाळीने खेळत असू. कधी तो जिंकायचा, कधी मी तर कधी रश्मी. रात्री दीड दोन वाजेपर्यंत आमचा गेम चालायचा. कधी रात्री पिक्चर बघत असू. तिथे सिनेमाच्या सी. डी. मिळण्याची एक लायब्ररी होती. हिंदी सिनेमाच्या सी.डी. पण मिळत. आपल्याला हवे ते पिक्चर ऑन लाईन बुक करायचे. ते पोस्टाने सी.डी. पाठवत. शिवाय ती वापस करतांना आपल्याला पोस्टात जायची गरज नाही. अपार्टमेंटच्या ऑफिसमध्ये एक ट्रे ठेवलेला असे. अपार्टमेंट मधील सर्व

लोकांनी आपले टपाल तिथे नेवून टाकायचे. दुपारी पोस्टाची गाडी येवून ते घेवून जायची. पोस्टमनचा ड्रेस म्हणजे पांढरा शुभ्र शर्ट आणि पांढरी शुभ्र हाफ पँट. कामात एवढा नियमितपणा की त्याची वेळ कधी चुकायची नाही. अशा प्रकारे सी.डी. मागवून इथे माझे बघायचे राहिलेले बरेच पिक्चर मी तिथे बघून घेतले. अगदी खूप जुने जुने सुध्दा.

सारंगचा आवाज खूप छान आहे आणि त्याला गाण्याची पण आवड आहे. झी मराठीवर मी ज्या सिरियल्स बघायचे त्याची सगळी टायटल सॉंग्स त्याला पाठ झाली होती. मनात आले की केव्हाही तो ती गुणगुणायचा. वहिनीसाहेब, कुलवधू, असंभव, होम मिनिस्टर, सारेगम अशा सगळयाच सिरियल्सची. रात्रीचा वेळ तर असाच, हसण्यात, खेळण्यात आणि गप्पांमध्ये जायचा. सारंग खूप गमतीजमती करायचा आणि आम्हाला खूप हसवायचा. सिरीयल मधल्या लोकांची नक्कल करायचा. माझ्या सगळयात आवडत्या दोन सिरियल्स म्हणजे असंभव आणि सारेगम लिटल चॅंम्प. माझ्यामुळे ती दोघे पण त्या दोन्ही सिरियल्स बघायची. आणि मग असंभव मधील त्या आजोबांसारखा मान हलवून तो बोलायचा.

'मी.. काय म्हणतो... रश्मी, बाळ, आता तुला नववा महिना लागला आहे... तेव्हा थोडं सावकाश काम करत जा... बरं का!.. ऐकत जावं थोडं म्हाताऱ्या माणसाचं'....

इकडे सकाळी अकरा वाजता सुरु होणारे सारेगमचे रिपीट टेलिकास्ट तिकडे रात्री दहा वाजता दिसत असे. त्यावेळी आमची जेवणे चालू असत. जेवणाचा बेत कसा झाला, भाजी आवडली का? असे विचारले की अवधूत गुप्तेची नक्कल करीत तो म्हणायचा.

'व्वा.. चाबूक, फंटू, कसं काय जमतं बुवा तुम्हाला हे सगळं? मला तर खरं आश्चर्यच वाटतं. एकदम झकास. च्या मारी धरून फटाक..'

तो असे काही बोलू लागला की रश्मी आणि मी हसून हसून लोटपोट होत असू.

त्यांचा दोघांचा मित्र परिवार पण तसाच. जवळच दोन घरे सोडून गणेश आणि प्रीती राहायचे. त्यांचा एक वर्षाचा मुलगा आदि. अतिशय गोड. तसेच आनंद – अमृता

आणि हेमा - पराग. आनंद अमृताचा मुलगा ईशान सहा महिन्यांचा तर हेमा परागचा अथर्व दोन वर्षांचा. हेमा दुसऱ्यांदा प्रेग्नंट होती आणि एक दोन महिन्यात तिची पण डेट होतीच. सर्वजण जमले म्हणजे, खाणे, चहा-पाणी, गप्पा चालायच्या. त्यातल्या त्यात कुणाचे आई वडील आले म्हणजे सगळयांनाच आनंद होत असे. प्रीतीची तर रोज एक चक्कर असायचीच. तेव्हा ती पण जॉब करत नव्हती. घरीच असायची. ती एखादे दिवशी नाही आली तर आम्हाला चुकल्या चुकल्या सारखे व्हायचे.

ठरल्याप्रमाणे रश्मीच्या लेडी डॉक्टरांकडून तिचे चेकअप होत असे. यावेळी मीही तिच्याबरोबर गेले होते. तिकडे आपल्यासारखे डॉक्टरांच्या केबिनमध्ये बोलवत नाहीत. छोट्या छोट्या चेकअप रूम्स असतात. त्या रूम मधेच पेशंटची चेअर आणि तपासण्याचे सगळे सामान असते. ठरलेल्या वेळी आपण वेटिंग रूम मध्ये जावून बसल्यानंतर त्या त्या डॉक्टरांची नर्स येवून आपल्या पेशंटचे नाव घेवून त्याला बोलवते. सगळया प्री टेस्ट्स घेवून पेशंटला एका रूम मध्ये बसवते. आणि मग डॉक्टर त्या रुममध्ये येवून पेशंटला तपासतात. रश्मीची डॉक्टर एक व्हियेतनामी लेडी डॉक्टर होती. मुलगीच होती आणि खूप गोड होती. तिची पण नुकतीच डिलिव्हरी झाली होती आणि तिला चार महिन्यांचे बाळ होते. तिथे पेशंटला तपासताना जवळ आई, वडील आणि नवरा यांना उपस्थित राहता येते. त्याप्रमाणे मी आणि सारंग दोघेही तिथे होतो. रश्मीने माझी ओळख तिच्याशी करून दिली. तेव्हा हसून ती मला म्हणाली,

'ओह, नाईस टू मीट यू.' मी फक्त हसले. त्यावर काय म्हणावे ते मला सुचलेच नाही. सगळे तपासून झाल्यावर परत जाताना ती पुन्हा म्हणाली, 'ग्लॅड टू मिट यू.' मी पुन्हा फक्त हसले.

नंतर बाहेर आल्यावर रश्मी मला म्हणाली की आपण पण तिला तसेच म्हणायचे. नाईस टू मिट यू, ग्लॅड टू मिट यू किंवा सेम टू मी.. मग मी तिला म्हणाले, की 'अगं मला माहित होते पण वेळेवर सुचले नाही. आणि तू पण मला आधी का सांगितले नाही. मला वाटले की आपण काहीतरी चुकीचे बोलून गेलो तर उगाच कशाला. म्हणून मी गप्प बसले.'

रश्मीला दोन जानेवारी डेट दिली होती. मी सहा डिसेंबरलाच तिथे गेले होते. त्यामुळे आम्हाला आधी बरेच फिरता आले. रश्मी एकदम चुणचुणीत होती. सुस्त बिलकुल झाली नव्हती. कुठेही जायचे म्हंटले की उत्साहाने ती पुढे असे. तिलाच खूप फिरावेसे वाटत असे.

माझी पुतणी अनघा हिचे दीर शार्दूल आणि मेघना देशपांडे हे प्लेझन्टनला राहायचे. मेघनाने आम्हाला सर्वांनाच एक दिवस जेवायला बोलवले होते. त्यांची मुलगी अनुष्का हिच्या गोड बडबडीमध्ये दिवस कसा गेला ते कळले पण नाही. तिथून लाइव्हमोअर हे मंदिर जवळ होते. तिथे आम्ही गेलो. सगळयाच हिंदू देवदेवतांच्या छोट्या छोट्या मूर्ती होत्या. मंदिर स्वच्छ होते, शांतता होती आणि बऱ्यापैकी गर्दी पण होती. तिथे त्यावेळी भगवदगीतेचा सप्ताह चालू होता. सकाळी प्रवचन झाले होते आणि संध्याकाळी पण प्रवचन होते. मध्यंतरीच्या काळात तिथल्याच मुली भजन आणि अभंग म्हणत होत्या. या सर्व लोकांना हे माहित आहे, त्यावर ते अभ्यास पण करतात हे प्रत्यक्ष बघून मला आश्चर्य वाटत होते. आपल्या हिंदू संस्कृतीचा अभिमान वाटून मन सुखावले होते.

त्याच वेळी सत्तावीस डिसेंबरला आदिचा पहिला वाढदिवस होता. अपार्टमेंटच्या ऑफिसमध्ये एक हॉल होता आणि तिथे असे कार्यक्रम करता येत. इकडचे कार्यक्रम कसे असतात, सगळे मिळून कसे एन्जॉय करतात त्याची मला उत्सुकता होतीच. आम्हाला सारखे वाटायचे की रश्मीची डिलिव्हरी पण सत्तावीस तारखेलाच होते का काय? प्रीतीच्या आणि तिच्या गप्पा चालायच्या. त्या दोघी एकमेकीना म्हणायच्या, ‘आपण आपल्या दोघींच्याही बाळाचा वाढदिवस एकत्रच साजरा करत जावू. एकाच हॉलमध्ये एका बाजूला एकीकडे पिंक आणि एकीकडे ब्ल्यू अशी सजावट करत जावू.’ तिकडे मुली असल्या की पिंक कलर आणि मुलगा असला की ब्ल्यू कलर वापरतात. रश्मीला मुलगी होणार हे आधीच माहित होते. त्यामुळे त्यांच्या या गप्पा चालायच्या. पण सत्तावीस तारखेचा दिवस मजेत गेला. आदिच्या वाढदिवसाला रश्मी हजर राहिली. त्यावेळी यांचे सगळे भारतीय मित्र मैत्रिणी आलेल्या होत्या. सुप्रिया आली होती. त्यावेळी ती पण प्रेग्नंट होती, तिलाही नववा महिना लागला होता आणि तिचे पण आईवडील आलेले होते. तिची आई आली

असल्यामुळे मला सोबत झाली आणि बरे वाटले. आपल्या बरोबरीचे कुणीतरी आहे याचे समाधान झाले. त्यानाही नक्कीच तसे वाटले असणार.

सगळे मराठीतून बोलत होते, जेवणाचा मेनू पण आपल्या सारखाच. या सर्व वातावरणामुळे आपण भारतापासून फार कुठेतरी दूर, लांब आहोत असे मुळीच वाटले नाही. एकोन्तीस डिसेंबरला

संध्याकाळी फिरण्यासाठी म्हणून आम्ही बाहेर पडलो. त्यावेळी रश्मीला थोडे थोडे पोटात दुखायला सुरवात झाली. तिला काहीच सुचत नव्हते. आम्ही लगेच घरी आलो. मी पटकन गरम गरम खिचडी केली. आधी तिला जेवायला घातले. तिकडे स्त्री प्रेग्नंट असतानाच नवरा बायको, दोघानाही एक ट्रेनिंग देतात. त्यात बरीच माहिती देतात. कळा सुरु झाल्याबरोबर लगेच हॉस्पिटल मध्ये दाखल करून घेत नाहीत. त्यांचे वेळेचे काही निर्बंध सांगितलेले असतात. म्हणजे कळा सुरु झाल्यानंतर पहिल्यांदा येणाऱ्या कळा अर्ध्या अर्ध्या तासांनी येतील. ती कळ दोन सेकंद असेल. नंतर हळू हळू वेळेचे अंतर कमी कमी होत जाईल. आणि दहा दहा मिनिटांच्या अंतराने कळा येवू लागतील. त्यांचा वेळ पाच सेकंद असेल. त्यानंतर पाच पाच मिनिटांच्या अंतराने कळा येतील. त्यावेळी तुम्ही हॉस्पिटलमध्ये आणायचे. त्या आधी नाही. जर तुम्ही खूप आधी, दुखायला लागल्याबरोबर गेलात तर प्रवेश मिळत नाही.




अशावेळी कुणाचे घर खूपच दूर असेल तर ते आधीच जावून तिथेच गाडीत बसून राहतात. खरे तर  तिथे स्वतःची गाडी असते, स्वतःच ड्राईव्ह करायचे असते आणि रस्ते एकदम स्मूथ असतात, रहदारी खोळंबून राहण्याचा प्रश्न नसतो. त्यामुळे वेळेवर हॉस्पिटलमध्ये जाणेही

काही जास्त अवघड नाही. ज्या स्त्रियांना झर करायचे असते, त्यांचा दिवस आणि वेळ ठरलेली असते. त्या तर दिलेल्या वेळेत स्वतःच तिथे जावून हजर होतात.

ट्रेनिंगमध्ये सांगितल्याप्रमाणे सारंग हे सगळे, म्हणजे  किती वाजता कळ आली, ती कितीवेळ राहिली, बोर्डवर लिहून ठेवीत होता. जेव्हा पाच मिनिटांच्या अंतराने कळा सुरु झाल्या तेव्हा आम्ही हॉस्पिटल मध्ये जाण्यासाठी निघालो. रात्रीचे बारा वाजले होते. मी देवापाशी दिवा लावला. रश्मीने देवाला नमस्कार केला, मला नमस्कार केला. बिचारी अगदी मुकाट्याने सगळे सहन करत होती. ते बघून माझा जीव थोडा थोडा होत होता. पण मी माझ्या मनाची समजूत घालीत होते, आई व्हायचे म्हणजे हे सगळे सहन करणे आलेच. हॉस्पिटलमध्ये गेल्याबरोबर आम्हाला आत प्रवेश मिळाला. इथे पण तसेच. प्रत्येक पेशंटची वेगळी रूम. सर्व सोयींनी उपयुक्त असलेली. त्या रूम मध्ये त्या स्त्री बरोबर तिचा नवरा आणि आई, म्हणजे नवऱ्याची किंवा बायकोची, यांना प्रवेश मिळतो. नॉर्मल डिलिव्हरी असेल तर डिलिव्हरी होताना सुध्दा ते तिथे थांबू शकतात. बायकोच्या बाळंतपणात नवऱ्याचा मात्र पूर्ण सहभाग असतो. प्रत्यक्ष बाळंतपण होताना नवरा जवळच असतो आणि कळा देतांना ('पुश करतांना) नवऱ्याने सुध्दा बायकोला सपोर्ट करायचा असतो. हुं... हुं... असे जोर लावून म्हणायचे असते. हे सुध्दा त्यांना ट्रेनिंगमध्ये सांगितलेले असते. बाळाचा जन्म झाल्यावर  बाळाची नाळ सुध्दा नवऱ्याला कापायला देतात असे मी ऐकले होते.  बाळंतपणात बायकोला काय यातना होतात हे पुरुषांना समजण्याचा या पेक्षा आणखी कोणता चांगला उपाय अस्तित्वात असू शकेल?

माझ्या डोळयासमोर आपल्या इकडचे बाळंतपण दिसत होते. पहिल्या वेळी सहसा बायको माहेरी गेलेली असते आणि ती बाळंतीण झाल्यावरच फोनवरून नवऱ्याला ही बातमी सांगितली जाते. आमच्या वेळी तर फोनची सोय नव्हती. तार केली तर ती लौकर मिळेलच याची शाश्वती नव्हती. निलू आणि नमा दोघींच्याही जन्माच्या वेळी हे इचलकरंजी आणि सांगलीला होते. त्यावेळी नांदेड परभणी पासून इचलकरंजी, सांगली म्हणजे परदेशात गेल्यासारखेच वाटायचे. माझे लग्न ठरत असताना माझ्या माहेरच्या लोकांनी सांगली कुठे आहे ते नकाशात बघून अभ्यास केला होता. निलू, नमाचा जन्म झाल्याची बातमी त्यांना

पत्राने चार पाच दिवसानंतर कळली होती. रश्मीच्या वेळी मात्र ते जवळ होते म्हणजे इतर नवऱ्यांप्रमाणे दवाखान्याच्या बाहेर चकरा मारत होते.

तिथे तसे नव्हते. मी आणि सारंग रश्मीच्या जवळच बसून होतो. डॉक्टर आणि नर्स सारखे येवून बघत. पण जसजशा रश्मीच्या वेदना वाढत होत्या तसतसे मला ते सहन होत नव्हते. शिवाय मला वारंवार होणारा बाथरूमचा त्रास. त्यांना आपला डिस्टर्ब नको म्हणून मी बाहेर वेटिंग रुममध्ये थांबले. ते हॉस्पिटल, हॉस्पिटल वाटतच नव्हते, एवढे तेथील वातावरण छान होते. डॉक्टर आणि नर्स सगळेच हसून स्वागत करत होते, बोलत होते. भेटणारा प्रत्येकजण एकमेकांना हसून विचारीत असे, 'हाय, हॅलो, हाऊ आर यू?' आणि तो दुसरा किंवा दुसरी म्हणे, 'ओह! फाईन, थँक यू.' मला मात्र हे असे बोलणे काही जमत नसे. मला कुणी काही बोलले किंवा विचारले की मी नुसती हसत असे. कदाचित त्यांना असे वाटत असेल की या बाईला इंग्लिश बोलता नसेल किंवा कळत नसेल. पण काही का वाटेना बापडे, बिन ओळखीच्या लोकांना प्रतिसाद न देण्याची इथली रक्तातली सवय कशी जाणार? बुजरेपणा असे गोंडस नाव त्याला देता येईल.

मी रात्रभर वेटिंग रूम मध्ये बसून सारंग केव्हा येतो आणि मला ती गोड बातमी देतो याची वाट बघत होते. सकाळी सारंग आला पण अद्यापही रश्मीची सुटका झाली नव्हती. मला काळजी वाटू लागली पण मी काहीच बोलले नाही. रात्री बारा वाजता जोरात कळा येत असताना, आत्तापर्यंत तिची डिलिव्हरी व्हायला पाहिजे असा माझा अंदाज होता. पण आजकाल वेदना न होण्याचे जे इंजेक्शन निघाले आहे ते दिल्यामुळे कळा येतात पण दुखत नाही, त्यामुळे पुश करण्यासाठी जसा म्हणावा तसा जोर पडत नाही, असे माझे लॉजिक होते. पण मी हे सगळे माझ्या मनातच ठेवले. सारंगने मला कॉफी आणि नाश्ता आणून दिला आणि तो पुन्हा निघून गेला. मी आपली काळजी करत वाट बघत बसले. शेवटी दुपारी सारंग आला आणि त्याने मला ती गोड बातमी दिली. ३० डिसेंबर २००८ ला, दुपारी साडे बाराला राधिकाचा जन्म झाला. रश्मीला, आपल्या सगळयात छोट्या बाळाला, बाळ झाले ही बातमीच इतकी आनंदाची आणि उत्साहाची होती की अती आनंदाने मला

एकदम रडायलाच आले. मी पटकन बाळाला बघायला गेले. नुकतेच जन्मलेले ते गोड बाळ बघून माझ्या डोळयांचे पारणे फिटले.

तिथे एक पुरुष नर्स होता आणि बायका तरी काय करतील एवढ्या सहजतेने तो बाळाला हाताळीत होता. सगळी माहिती सांगत होता. तुम्हाला काही अडचण आहे का? तुम्हाला काही प्रश्न विचारायचे असतील, तुमच्या मनात काही शंका असतील तर विचारा असे ते लोक म्हणायचे. रुममध्ये एक बोर्ड होता, त्यावर जी नर्स ड्युटीवर असेल तिचे नाव असायचे. बेडला सगळी बटने होती. नर्सला बोलवण्यासाठी एक बटन होते. ते दाबले की आधी इंटरकॉमवर ते विचारीत, 'तुम्हाला काय पाहिजे?' आणि मग त्या तयारीने लगेच ती नर्स तिथे हजर होई. चहा, नाश्ता, जेवण सगळे हॉस्पिटलमधूनच मिळे. बाळासाठी तीन पर्याय होते. एक तर संपूर्ण वेळ रात्री तुम्ही तुमच्या बाळाला तुमच्या जवळच ठेवू शकता. तुम्ही जेव्हा केव्हा बोलवाल तेव्हा नर्स तुमच्या मदतीला हजर होईल. दुसरे म्हणजे बाळ रात्रभर नर्सरीमध्ये राहील. जेव्हा त्याला भूक लागेल तेव्हा त्या वेळेप्रमाणे दोन दोन तासाला नर्स त्याला तुमच्याजवळ घेवून येईल. त्याची भूक भागली की पुन्हा त्याला नर्सरीमध्ये घेवून जाईल. बाळाला इकडून तिकडे ने आण करण्यासाठी बाबा गाड्या असत. बाळाला कुणीही सारखे हात लावत नसे. आणि तिसरा पर्याय म्हणजे बाळ रात्रभर नर्सरीमध्येच राहील. तिथेच त्याला दूध वगैरे पाजवण्यात येईल. आईच्या तब्येतीप्रमाणे तुम्ही कुठलाही पर्याय स्वीकारू शकता. बाळाची ते लोक खूपच काळजी घेतात. बाळाच्या, बाळाच्या आईच्या आणि बाळाच्या बाबांच्या हाताला एक बेल्ट बांधलेला असतो. त्यावर एक नंबर असतो. प्रत्येक वेळी बाळाला तुमच्या जवळ देतांना तो नंबर बघूनच बाळाला तुमच्या जवळ देतात.

रुममध्ये एक टी.व्ही. असतो. त्याचे बटन सुध्दा आईच्या बेडला असते. त्या टी. व्ही. वर नुकत्याच जन्मलेल्या बाळाला कसे हाताळावे, काय करावे, त्याला दूध कसे पाजवावे इ. व्हिडीओ चालू असतात. तसेच दुपारी एक तास एक क्लास असतो. तो प्रत्येक आईवडिलांनी एक वेळेस अटेंड करायचा असतो. तिथे डॉक्टर येवून काही सूचना देतात. तुम्हाला काही प्रश्न विचारायचे असतील, तुमच्या काही शंका असतील तर त्याचे पण

निरसन करतात. प्रेग्नंसी मध्ये जे एक दिवसाचे ट्रेनिंग दिलेले असते, त्याचाच हा पुढचा भाग असतो. बाळाचे नाव जन्मल्याबरोबर सांगावे लागते. कारण तेथील सगळया कागदपत्रांवर त्याच नावाची नोंद असते.

कारमध्ये लहान मुलांसाठी एक कारसीट असते. ते बाळाच्या जन्माच्या आधीच बसवून घ्यावे लागते. कारसीट नसले तर बाळाला गाडीत मांडीवर घेवून बसता येत नाही. तो एक मोठा गुन्हा आहे. कारमध्ये बाळाला कारसीट मधेच ठेवावे लागते. कितीही रडले तरीही गाडी चालू असताना बाळाला कारसीटच्या बाहेर काढायचे नाही. बाळ जर खूपच रडत असेल तर गाडी एका बाजूला थांबवून बाळाला घ्यायचे. पण कार अशी मधेच कुठेही थांबवता येत नाही. पार्किंगच्या नियमाप्रमाणेच ती पार्क करावी लागते. प्रत्येकाकडे कार असणे अगदी आवश्यक आहे. त्याशिवाय तुम्ही काहीच करू शकत नाही. सिटी बस आणि लोकल ट्रेन पण दिसत होत्या पण त्यात माणसे खूपच कमी दिसायची. टॅक्सी पण असतात पण आपल्याला हवी तेव्हा, हवी तिथे टॅक्सी मिळत नाही. त्यांचे नंबर इन्टरनेटवर शोधून त्यांना बोलवावे लागते आणि त्याचे दरही खूप जास्त असतात.

मुलगी होणार हे आधीच माहित असल्यामुळे तिचे नाव काय ठेवायचे हे रश्मी आणि सारंगने आधीच ठरवून ठेवले होते. त्याप्रमाणे बाळाचे 'राधिका' हे नाव जाहीर केले. ते लोक 'रॅडिका' असा उच्चार करीत. राधिकाचा जन्म झाल्याबरोबर त्यांच्या पध्दती प्रमाणे सर्व उपचार सुरु झाले. जन्मल्याबरोबर बाळाला डायपर बांधतात, त्यामुळे शी-शू ची दुपटी, कपडे ओले होणे वगैरे काही भानगड नाही. बाळाच्या जन्माच्या आधीच आवश्यक गोष्टींची सगळी खरेदी करून ठेवली होती. सगळीकडे अगदी स्वच्छ. घरातही तसेच, सगळे स्वच्छ. डास नाहीत, माशा नाहीत, मुंग्या नाहीत, गर्मी नाही, त्यामुळे बाळ रडण्याचा प्रश्नच नाही. वेळच्या वेळी भूक भागली आणि त्याचे काही दुखत नसले की झाले.

या सर्व काळात सारंग आणि रश्मी यांचे मित्र गणेश-प्रीती, आनंद-अमृता, पराग-हेमा या सर्वांची खूप मदत झाली. सारंगचा मोठा भाऊ मकरंद हा पण तिथेच असतो, तोही दोन तीन दिवस हॉस्पिटलमध्ये आमच्या सोबत असायचा. मी रात्री हॉस्पिटलमध्येच

झोपायची. रात्री बाळाला रश्मीजवळ देणे, डायपर बदलणे हे काम तेथील नर्स करायच्या, त्यामुळे मला तेही काम नव्हते. सकाळी मी घरी येवून अंघोळ, पूजा, स्वयंपाक करून पुन्हा हॉस्पिटलमध्ये जायची. या मित्रांपैकी कुणीही मला नेवून, आणून सोडत. हेमाने एक दिवस जेवणाचा डबा पाठवला होता. रश्मीला जरी तिथे जेवण होते तरी मी तिला घरून शिरा, मऊ भात करून पाठवत होते. तिथे मायक्रोवेव्ह असल्यामुळे केव्हाही तो गरम करता येई.

डिलिव्हरी नॉर्मल झाल्यामुळे तीन दिवसांनी रश्मी आणि राधिकाला घरी आणले. घरी आणतेवेळी प्रीती-गणेश होतेच. प्रीतीने मला घर सजवण्यासाठी मदत केली. गणेशने फुगे आणले. आम्ही घर सजवले आणि राधिकाच्या स्वागताची जय्यत तयारी केली.

रश्मी आणि राधिकाला घरी आणल्यानंतर मात्र माझ्या समोर बरेच प्रश्न उभे राहिले. पहिला मोठ्ठा प्रश्न होता तो म्हणजे राधिकाच्या आंघोळीचा. डॉक्टर म्हणाले होते की नाळ पडल्याशिवाय आंघोळ घालू नका. शिवाय थंडी पण खूप होती. आपल्याकडे तर मूल जन्मले की लगेच त्याला आंघोळ घालतात. पण तिथल्या हवेमुळे आणि डॉक्टरांनी सांगितल्यामुळे मी काही आंघोळ घालण्याचा घाट घातला नाही. नंतर पंधरा दिवसांनी बाळाला चेकअप साठी घेवून जायचे होते त्यावेळी विचारून पुढे कसे करायचे ते आम्ही ठरवले. शिवाय बाळ थोडे मोठे पण झाले असते.

बाळाच्या आंघोळीसाठी एक छोटे टब आणले होते. पण एवढ्या छोट्या बाळाला टबमध्ये ठेवून व्यवस्थित आंघोळ घालता येत नव्हती. मला आपली भारतीय पध्दतच छान वाटली. मी बाळाला तेल लावून, मालीश करून आपल्याप्रमाणेच दोन्ही पायांवर घेवूनच आंघोळ घालण्यास सुरवात केली. विशेष म्हणजे राधिकालाही ते आवडू लागले. आंघोळ घालताना ती अजिबात रडत नव्हती, त्यामुळे माझे काम सोपे झाले. बाळंतीण बाईला मात्र अंगाला तेल-हळद लावणे, मालिश करणे, शेक-शेगडी असले काही प्रकार करता येत नव्हते. तरी मी एक दोन दिवसाला रश्मीला अंगाला तेल लावून द्यायची.

रश्मीच्या खाण्यापिण्याची मात्र मी काळजी घेत होते. भारतातून येतांना काही घरगुती औषधे आणली होती, ती दिली. गरम, ताजे, कमी तिखटाचे जेवण मी

तिच्यासाठी बनवत असे. सव्वा महिना होईपर्यंत कुठेही बाहेर जायचे नाही असे मी ठरवून टाकले. सारंग मात्र या बाबतीत माझ्याशी बराच वाद घालीत असे. तो सारखे म्हणे हे असेच का? तसेच का? हे खावू नये, ते खावू नये हे तुम्ही कशाच्या आधारावर ठरवता? का आपले पूर्वापारपासून चालत आहे म्हणून तेच चालू ठेवायचे. ते बरोबर आहे का याचा तुम्ही कधी विचार करता का? सव्वा महिना घराच्या बाहेर पडायचे नाही याच्या मागे काय कारण आहे? 'सव्वा महिना' हा काय प्रकार आहे? तो कुणी ठरवला? त्याला कारण काय? हे सगळे तुम्ही पुराव्यानिशी सिद्ध करून दाखवा. मी पण बराच वाद घाली पण सिद्ध कसे करून दाखवायचे?

प्रीतीकडे बालाजी तांबे यांचे पुस्तक होते. त्यात भारतीय पध्दतीप्रमाणे बाळंतपण, त्याची कारणमीमांसा सगळे व्यवस्थित दिलेले होते. प्रीतीने मला ते मुद्दाम आणून दिले होते. त्या पुस्तकाचा आधार घेवून मी सारंगशी चर्चा करी आणि तो लेखी पुरावा त्याला दाखवी. शेवटी तो म्हणे 'बरं बाबा, तुमचंच खरं'.

अमेरिकेत असलो तरी आपल्या घरी करावयाचे भारतीय संस्कार मला स्वस्थ बसू देत नव्हते. पण ते कसे निभावून न्यावेत हा समोर पडत असलेला मोठा प्रश्न. पाचवे दिवशी पाचवीची पूजा. कशी मांडावी, कुठे मांडावी? पाटा वरवंटा नाही. भिंतीवर काही चित्र वगैरे काढायचे नाही. पूजेचे सामान मी इथून जाताना बरोबर घेवून गेले होते. पण काय करावे असा मी विचार करू लागले. माझे प्रीतीच्या आईशी आधीच बोलणे झाले होते. आदिच्या वेळेला त्या आल्या होत्या. त्यांनी सांगितल्याप्रमाणे मग देवाजवळ एका चौरंगावर मी एक ब्लाउजपीस ठेवून त्यावर सगळी पूजा मांडली. सामान बरोबर नेल्यामुळे थोडे समाधान वाटले, नाहीतर उगाच मनाला रुखरुख लागून राहिली असती.

संध्याकाळी व्यवस्थित स्वयंपाक करून देवाला नैवेद्य दाखवला. जेवढे शक्य होते ते सगळे केले. जिवतीची पूजा करून राधिकाच्या हाताला जिवती बांधली. तसेच बारावे दिवशी पण असेच देवापुढे ठेवून बाळाचे नाव ठेवले. खरे तर हॉस्पिटलमध्ये आधीच तिचे राधिका हे नाव ठेवून झाले होते. पण आपल्या रिती प्रमाणे सगळे करावे अशी माझी इच्छा होती. हेमा-परागला जेवायला सांगितले. पुरण घातले. आपल्या भारतीय

पध्दतीप्रमाणे पातळ भाजी, कढी, भजे असा स्वयंपाक केला. मी माझ्या सोबत जे आहेराचे सामान आणि बाळासाठी सोन्याचे दागिने नेले होते ते सर्व त्या दिवशी त्यांना दिले. त्या दिवशी प्रीती आणि अमृताला यायला जमले नाही. मी पुरण जास्त घालून ठेवले होते. दुसरे दिवशी सकाळी पोळ्या करून ठेवल्या. रात्री ते सर्वजण आले. सर्वांनाच पोळया खूप आवडल्या. खूप दिवसांनी अशा आपल्या घरगुती पुरणपोळी खायला मिळाल्यामुळे त्यांना आनंद झाला होता.

सर्वांच्या बरोबर मी सारंगलाही आग्रह करत होते. 'सारंग, तुम्ही आणखी एक पोळी घ्या.' (सारंग माझा जावई असल्यामुळे मी बरेच दिवस त्याला अहो जाहो करत होते. त्याने मला कितीदा तरी सांगितले, तसे म्हणत जावू नका. मला अरे सारंग म्हणा, पण मला ते पटत नव्हते.) गणेश आणि आनंद सारंगला चिडवू लागले, 'अहो घ्या हो जावईबापू. घ्या हो अजून एक पोळी.' रश्मी मला हसत हसत म्हणाली, 'आई, तू सारंगला अहो जाहो म्हणतेस ना, त्यामुळे हे सगळे त्याला चिडवत आहेत. मग मला पण वाटले की, खरंच हे सगळे किती लहान आहेत आपल्यापेक्षा, अगदी आपल्या मुलांसारखेच. आणि त्यांना आपण हे असे अहो वगैरे असे का म्हणतो? शिवाय तेथील वातावरणही तसे नव्हते. पण प्रयत्न करूनही मला सारंगला अरे तुरे करणे जमेना. पटकन 'तुम्ही' असेच तोंडात यायचे. रश्मीचे लग्न ठरले तेव्हा पण सारंगचे आई वडील मला म्हणाले होते की, सारंग तुमचा जावई आहे खरा, पण तो तुमच्या मुलासारखाच आहे. त्याला तुम्ही अरे सारंग असे म्हणालात तरी आमची काही हरकत नाही. पण मला काही ते जमेना. तो आपला जावई आहे आणि त्याला आपण असे अरे म्हणायचे म्हणजे मला उगाच अपराध्या सारखे वाटायचे. रश्मी सोबत बोलतांना त्याच्या माघारी मात्र मी त्याचा एकेरी उल्लेख करत असे.

एक दिवस रात्री आम्ही सगळे जेवायला बसलो होतो. सारंगला भाजी हवी होती. मी त्याला भाजी वाढण्यासाठी उठू लागले. तेवढ्यात तो मला म्हणाला, 'नको, नको, मां तुम्ही उठू नका, मी घेतो.' मी पटकन म्हणाले, 'पातेल्यात आहे ती घे, सगळीच घेवून

टाक.' रश्मी सारंगला म्हणाली, 'सारंग, ऐकलंस का  आई तुला काय म्हणाली ते!' तो म्हणाला, 'मी ऐकलंय, पण मला खरच वाटत नाही ते. मां काय म्हणालात तुम्ही?' मी म्हणाले, 'त्यात खरं न वाटण्यासारखं काय आहे? पातेल्यातली सगळी भाजी घेवून टाक असे म्हणाले.' आणि ती दोघे हसायला लागली. तेव्हा माझ्या लक्षात आले की आपण त्याला 'घेवून टाका' असे नाही तर 'घेवून टाक' असे म्हणालो. मी काही बोलणार तेवढ्यात तो म्हणाला, 'हे बघा मां, आता तुम्हाला मागे जाता येणार नाही. एकदा तुम्ही 'तू' असे म्हणालात ना, तर आता पुन्हा 'तुम्ही'  म्हणायचे नाही.' एका साध्या प्रसंगाने आम्ही किती जवळ आलो होतो. सहवासाने माणसे जवळ येतात म्हणतात ते खरेच आहे. तेव्हा पासून मी त्याला अरे तुरे करायला लागले.



तेवीस जानेवारीला रश्मी आणि सारंगच्या लग्नाचा दुसरा वाढदिवस होता. योगायोगाने मी त्यावेळी तिथे होते. रश्मीला बाळंतीण होवून तीन आठवडे झाले होते. मी रश्मीला बाहेर कुठे जावू देण्यासाठी तयार नव्हते. मला वाटायचे की, बाळंतीण  बाईने

बाळाला घेवून पहिल्यांदा बाहेर पडायचे ते आधी देवाच्या दर्शनाला जाण्यासाठीच. तेही सव्वा महिना झाल्यावरच. मी रश्मीला 'बाळंतीण बाई' असे म्हणाले की सारंग हसत असे. त्यामुळे रश्मी नाराज होवू नये म्हणून अमृता आणि प्रीतीने घरीच एक मस्त प्रोग्राम ठरवला. रात्री ऑफिस सुटल्यानंतर ते सगळे घरी आले. अमृता आणि प्रीतीनेच पाव भाजी केली. रश्मीसाठी तिला खाता येईल असा पुलाव केला. आनंद- अमृताने येतांना केक आणि 'स्लमडॉग मिलेनिअर' ची सी.डी. आणली होती. मला त्यांनी दोघींनी काहीही करू दिले नाही. सगळयांनी मिळून गप्पा, हसणे, फोटो, सिनेमा अशी काय काय धमाल केली.

राधिका आता हळूहळू मोठी होत होती. दिवसभर तिच्याशी खेळण्यात कसा वेळ जात होता ते कळत नव्हते. ती अंगाला आळोखे पिळोखे फार मस्त द्यायची. सगळे अंग खूपच वाकडे करायची. सारंग तिची नक्कल करायचा. कॅरम खेळतांना तो वाकडा होवून एखादा शॉट मारू लागला की आम्ही 'राधिका शॉट' म्हणून त्याला चिडवायचो. तो पण कॅरम खेळतांना मी ज्या काही कॉमेंट्स करायची त्याची नक्कल करायचा. मग खेळणे बाजूला राहून आम्ही नुसते हसत बसायचो.

मधून मधून सारखा पाऊस पडायचा. थंडीचे दिवस असल्यामुळे राधिकाला जपावे लागत होते. सव्वा महिना झाल्यावर राधिकाला घेवून आम्ही सनीवेल भागातील एका मंदिरात गेलो. येतांना हेमा परागकडे गेलो. हेमाला पण नववा महिना लागला होता. आम्ही गेलो तर हेमा स्वयंपाकाची तयारी करत होती. भात, भाज्या वगैरे करून ठेवल्या होत्या. तिला त्रास नको म्हणून पराग म्हणाला की आम्ही जवळच्या हॉटेलमधून काही घेवून येतो. तो सारंगला म्हणत होता की 'चल, आपण पैंसट मधून काहीतरी आणू.' तो एकदोनदा हेमाला पण म्हणाला की, 'मी आणि सारंग जावून पैंसट मधून पोळया, भाजी, पुलाव आणतो. रश्मीला जे खाता येईल तेच आणू. इंडियन रेस्टोरंट आहे. चांगले मिळते तिथे सगळे.' मी मनातल्या मनात विचार करू लागले की हे असे कसे नाव? पैंसट..? पण वाटले की इंडियन रेस्टोरंट आहे, हिंदीमध्ये पैंसट म्हणजे मराठीमध्ये पासष्ट होतात. असेल काहीतरी. मनात शंका होती पण विचारणे बरोबर वाटत नव्हते. जावू द्या म्हणून सोडून दिले. त्याप्रमाणे त्यांनी दोघांनी तिथून बरेच काही मागवले आणि आम्ही भरपूर जेवलो.

नंतर आम्ही एकदा असेच हेमा परागकडे जात होतो तेव्हा मला ते रेस्टोरंट दिसले. त्याचे नाव 'स्पाईस हट' असे होते. पराग बोलत असताना 'स्पाईस हट' असे भरभर म्हणत होता आणि मला ते पैंसट असे ऐकू येत होते. एक मोठे कोडे उलगडल्याचा मला आनंद झाला. मी हे कुणालाच सांगितले मात्र नाही. पण डोक्यातला गुंता सुटल्यामुळे छान वाटत होते. अजूनही ते आठवले की मला हसू येते.

इकडे येण्याच्या अगोदर मी औरंगाबादला गेले होते आणि नांदेडला वापस येतांना रेल्वे स्टेशनवर पाय घसरून पडले होते. त्यावेळी डाव्या हाताला हिसका बसून तो दुखायला लागला होता. त्यावेळी मी ते कुणालाही सांगितले नव्हते. मध्यंतरी तो हात दुखायचा कमी झाला होता पण आता परत तो हात थोडा थोडा दुखायला सुरवात झाली होती. डावा हात असल्यामुळे काम अडत नव्हते पण कधी कधी दुखणे अगदी असह्य होवून जाई. सारंग माझा हात दाबून देत असे. रश्मी तो शेकून काढण्यासाठी मला गरम पाणी देई. पण तो कमी होत नव्हता. ते दोघेही म्हणत की आपण डॉक्टरकडे जावू. पण तिकडे डॉक्टरकडे जाणे एवढे सोपे नव्हते. आधी डॉक्टरांची अपॉइंटमेंट घ्यावी लागत असे. ते डॉक्टर 'क्लोज' असले तर दुसरे डॉक्टर शोधावे लागत. 'क्लोज' म्हणजे तिथे डॉक्टरांना ठराविकच पेशंट घेण्याची परवानगी असे. तेवढे पेशंट झाले की ते त्यांच्याकडील प्रवेश बंद करत. लहान मुलांसाठी सुध्दा ते जन्मायच्या आधीच लहान मुलांचा डॉक्टर ठरवून ठेवावा लागत असे. नाहीतर तो 'क्लोज' झाला तर दुसरा लांबचा डॉक्टर बघावा लागे. कोण डॉक्टर उपलब्ध आहेत ते सगळे इंटरनेटवर, त्यांच्या सगळया माहितीसकट बघायला मिळे. रश्मी आणि सारंग राधिकासाठी डॉक्टर बघत त्यामुळे मला हे सगळे समजले होते. कोणत्याही गोष्टीविषयी माहिती मिळवायची असेल तर ती गुगल सर्च वर पटकन मिळे. कुणाच्या घरी जायचे असेल तर गुगल मॅपवर त्याचा संपूर्ण नकाशा बघायला मिळे. त्याच्या डायरेक्शन्स, कसे जायचे, कुठे जायचे सगळे कळत असे. कुणाला काही विचारायचे काम नाही. तसेच गाडीमध्ये पण जीपीआरएस ही एक नवीन सिस्टीम असायची. गाडी चालू असताना ती सिस्टीम चालू केली की समोरच्या छोट्या स्क्रीनवर सगळे दिसे. आपली गाडी कुठे आहे, कशी जात आहे, सध्या आपण कुठे आहोत, आपल्याला जिथे जायचे ते ठिकाण कुठे आहे, आपण जिथून निघालो ते ठिकाण कुठे आहे या सगळया सूचना ऐकू येवू शकत. एक एक

बघावे तो सगळे आश्चर्य वाटण्यासारखेच होते. (या सगळया आठ वर्षापूर्वीच्या असल्यामुळे त्या वेळी त्याचे खूपच अप्रूप वाटायचे. आता आपल्याकडेही हे सर्व प्रकार आले आहेत त्यामुळे त्यात काही नाविन्य राहिले नाही.)

माझ्या हाताचा हा असा प्रॉब्लेम होता. रोज मी त्याला मूव्ह किंवा आयोडेक्स लावून शेकत होते. सारंगने एक बेल्ट आणला होता. तो बांधला की बरे वाटे. सारंग माझ्या हाताला तो बेल्ट नीट बांधून देई. ती दोघे डॉक्टरच्या शोधात होती. मलाच नको वाटायचे. वाटायचे काही भलतेच निघाले तर? त्यापेक्षा एक दोन महिने असेच सहन करावे. आपल्या नांदेडला गेले की बघता येईल. काही का असेना. अमेरिकेत जे लोक राहतात त्यांचे इन्शुरन्स असते. आणि त्यांची सगळी मेडिकल बिले इन्शुरन्सद्वारे भरली जातात. मी पण येतांना मेडिकल इन्शुरन्स काढले होते पण त्याच्या भानगडी कुणी निस्तरत बसा ? आणि दुखणे तसे जास्त प्रमाणात नव्हते. जास्त ताण पडला तरच हात दुखायचा. काही हालचाल नाही केली तर बरा असायचा. मी डॉक्टरकडे जाण्याचे टाळू लागले. आपल्याकडच्या सारखे रस्त्याने चालता चालता दवाखान्यात जाणे तिथे जमत नसे. पण माझा हात दुखू लागला की त्यांना दोघांना कसेतरीच वाटे. कारण तो मागेपुढे होत नव्हता. शेवटी सारंगने एका इंडियन डॉक्टरची अपॉइंटमेंट घेतलीच. ती सतरा दिवसानंतरची मिळाली.

त्याच दरम्यान सॅनहोजे इथे चौदा, पंधरा आणि सोळा फेब्रुवारीला पहिले मराठी विश्व साहित्य संमेलन होणार होते. हे साहित्य संमेलन बऱ्याच अर्थांनी गाजले. विरोध, मतभेद सर्व काही पेपरमधून वाचायला मिळत होते. मी भारतात असतानाच हे वारे वहात होते. त्याच वेळेस मी रश्मीला पण या बद्दल सांगितले होते. ती दोघे पण त्याबद्दल पेपरमध्ये वाचत होती. रश्मी मला फोनवरच म्हणाली होती, 'आई, सॅनहोजे आपल्या घरापासून खूप जवळ आहे. तुला साहित्य संमेलन अटेंड करता येईल.' पण मी विचार केला होता की या बाळंतपणाच्या घाई गडबडीत कशाला काही ठरवायचे. नंतरचे नंतर बघू. तिला बाळंतीण होवून किती दिवस होतात, तिची आणि बाळाची तब्येत कशी आहे त्यावर सगळे अवलंबून होते. पण देवाच्या कृपेने सगळे काही ठीक होते. राधिका दीड महिन्याची

झाली होती. ती स्वतःशीच छान खेळत असे. रडणे तर अजिबात नव्हते. जवळ माणूस असलेले तिला कळू लागले. जवळ कुणी नसले की ती रडत असे. सगळे रोजचे रुटीन चालू होते. रश्मीने घरात वावरायला सुरवात केली होती. त्या वेळेस दोन दिवस सारंगला पण सुट्ट्या होत्या. रश्मीने माझे ऑन लाईन रजिस्ट्रेशन करून टाकले. तीन दिवस सर्व कार्यक्रम अटेंड करण्याचे एकशे पंचवीस डॉलर होते. आम्हाला वाटले जेवण, नाश्ता त्यातच असेल.

सुनीलरावची आतेबहीण, म्हणजे माझ्या बहिणीची, उषाची नणंद तिथे सिएटलला असते. ती आणि तिचे मिस्टर दोघेही साहित्य संमेलनाला येणार होते. ती आणि मी आम्ही दोघी एकमेकीना ओळखत होतो पण अद्याप भेटलो नव्हतो. एकदोनदा फोनवर बोलणे झाले होते, शिवाय मेलही करत होतो. आता ती साहित्य संमेलनाला येणार असल्यामुळे भेटीचा योग येणार होता. ती तिच्या मैत्रिणीकडे उतरली होती. एक दिवस संध्याकाळी आम्ही तिला जेवायला बोलवले. आपल्या नात्यातले कुणीतरी येणार म्हणून आम्हाला सर्वांनाच खूप आनंद झाला होता. ती पण खूप गप्पिष्ट निघाली. तिच्या सहवासात आणि गप्पांमध्ये चार पाच तासाचा वेळ कसा गेला ते कळलेच नाही. गेल्या पस्तीस, छत्तीस वर्षांपासून ती आणि तिचे मिस्टर दोघेही अमेरिकेत होते. बऱ्याच ठिकाणी फिरले. त्यांचे सगळे अनुभव ती सांगत होती. सहज बोलता बोलता ती म्हणाली की साहित्य संमेलनाचे तिकीट आता कमी झाले आहे. एकशे पंचवीस डॉलर ऐवजी आता नव्वद डॉलर केले आहे. आम्हाला आनंद झाला की आता आपले बाकीचे पस्तीस डॉलर परत मिळतील. रश्मीने लगेच बे एरियाच्या मंडळाला मेल केला. पण त्यांचे उत्तर आले की आम्ही जे एकशे पंचवीस डॉलर भरले होते ते फक्त रजिस्ट्रेशनचे होते. जेवण, चहा, नाश्ता यासाठी वेगळे एकशे पंचवीस डॉलर भरायचे होते, ते आम्ही भरले नव्हते. त्या एकशे पंचवीस डॉलरचे कमी होवून नव्वद डॉलर भरायचे होते. म्हणजे साहित्य संमेलन अटेंड करण्याचा एकूण खर्च अडीचशे डॉलर होता, तो आता दोनशे पंधरा झाला होता. म्हणजे आमचे पस्तीस डॉलर वापस मिळणे तर दूरच उलट आम्हाला अजून नव्वद डॉलर भरावे लागणार होते. मी मनाशी विचार केला की, दोनशे पंधरा डॉलर म्हणजे जवळ जवळ दहाहजार रुपयांच्या वर झाले. मी तर दिवसभर संमेलन अटेंड करणार होते. चहा, जेवण, नाश्ता बुकिंग नाही केले

तर दिवसभर कसे होणार? सोबत डबा वगैरे नेलेला थोडाच बरा दिसणार होता? रश्मी मला म्हणाली, 'आई, तू तीन दिवस सकाळी आठ वाजता जावून रात्री बारा-एक वाजता घरी येणार. दिवसभर कशी राहशील? बरे झाले आपल्याला लौकर कळले, नाहीतर तुझी खाण्यापिण्याची पंचाईत झाली असती.' तेही खरेच होते म्हणा. रश्मीने लगेच नव्वद डॉलर क्रेडीट कार्ड द्वारे जमा करून माझे तीन दिवसांचे चहा, नाश्ता, जेवण सर्व बुकिंग करून टाकले. तसे तिथे पण वेळेवर रोजचे खाण्यापिण्याचे तिकीट मिळत होते, पण आम्हाला ते आधी कुठे माहित होते?



# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही व्यावसायिक प्रकाशन संस्था नाही. काही सामाजिक ध्येय डोळ्यांसमोर ठेवून मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांच्यासाठी ही तरुणांची संस्था काम करते आहे. सध्या ई साहित्य प्रतिष्ठानचे सव्वा दोन लाख वाचक आहेत.

ई साहित्य प्रतिष्ठानच्या पुस्तक खजिन्यात सातत्याने नवनवीन भर पडत असते. २०१४ मध्ये सुमारे शंभर ई पुस्तके आम्ही प्रकाशित केली, २०१५ मध्ये सव्वाशे. २०१६ मध्ये नवीन खूप सारी पुस्तकं लवकरच येत आहेत. एकाहून एक भारी. ही सर्व पुस्तकं सर्वच्यासर्व साडेतीन लाख वाचकांना देण्याचा आटोकाट प्रयत्न केला जातो. पण प्रत्येक वेळी ते जमतेच असे नाही. अनेक वाचकांपर्यंत काही पुस्तके पोहोचत नाहीत. पण VIP सदस्यांना मात्र सर्व पुस्तके नक्की दिली जातात. तुम्हाला सर्वच्या सर्व पुस्तके हवी असतील तर VIP सभासद बना.

VIP सभासद बनणं अगदी सोप्पं आहे. आपल्या ओळखीच्या दहा लोकांचे मेल आय डी कळवा आणि बना VIP सभासद.

संपर्क साधा : esahity@gmail.com

ही सेवा पूर्णपणे निःशुल्क आहे. त्यामुळे आपले मित्र आपल्यावर खुश होतील. शिवाय आम्ही ही खात्री देतो की या ई मेल्सचा वापर फ़क्त आणि फ़क्त मराठी साहित्य पाठवण्यासाठीच केला जाईल. इतर कसल्याही जाहिराती पाठवून त्यांना त्रास दिला जाणार

नाही. तेव्हा लवकरात लवकर आपल्या माहितीतल्या दहा किंवा अधिक मराठी साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला द्या.

www.esahity.com या वेबसाईटला भेट द्या.

आपल्या पत्राची वाट पहात आहोत.

धन्यवाद

आपले नम्र

टीम ई साहित्य प्रतिष्ठान

